दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ७ । शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## अभ्यासाअभावी अंधारेंचे फेक नॅरेटिव्ह : आ. पाचपुते



**अहिल्यानगर :** माथाडी निरीक्षक पदाच्या भरतीतील कथित गैरप्रकारावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केलेल्या आरोपांवर भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी पलटवार केला आहे. 'सुषमाताई, तुमचा अभ्यास कमी पडतोय की जाणीवपूर्वक फेक नॅरेटिव्ह पसरवत आहात?' असा खोचक सवाल त्यांनी केला. अंधारे यांनी कामगार आयुक्तालयाच्या गट-क परीक्षेत नागपूरच्या एकाच परीक्षा केंद्रावरील २४ विद्यार्थी टॉपर कसे ठरले, असा प्रश्न उपस्थित करत भरती प्रक्रिया आणि निकालाच्या चौकशीची मागणी केली होती.मात्र, माथाडी निरीक्षक भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आली नसल्याचे आयोगाने स्पष्ट केल्याचा दाखला देत पाचपुते यांनी अंधारेंना लक्ष्य केले. 'शिळ्या कढीला ऊत आणण्यापेक्षा आधी अभ्यास करा,' असा टोला लगावत त्यांनी आरोप करण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासण्याचा सल्लाही दिला.

# सणांच्या जल्लोषाला प्रदूषणाचे बंधन!

## सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके फोडण्यास बंदी; डीजे, डॉल्बी अन् लेझरवरही निर्बंध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : दिवाळीसह वर्षभरातील सर्वच सण-उत्सवांमध्ये होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके फोडण्यास बंदी घालण्याचे आदेश राज्य सरकार आणि प्रशासनाला देण्यात आले आहेत. ध्वनीप्रदूषण करणारे डीजे, डॉल्बी, लाऊडस्पीकर तसेच डोळ्यांना इजा पोहोचवू शकणाऱ्या लेझर दिव्यांच्या वापरावरही न्यायालयाने निर्बंध घातले आहेत.**

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने सुमोटो याचिका आणि अन्य याचिकांवरील सुनावणीदरम्यान हे निर्देश दिले. फटाक्यांमधून होणाऱ्या प्रदूषणाचा लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. त्यामुळे सण साजरे करताना नागरिकांच्या आरोग्याचा विचार करणे आवश्यक

**सर्व धर्मांच्या सणांसाठी नियम लागू**

**२२ सप्टेंबर २०२६ रोजी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिलेले निर्देश केवळ दिवाळीपुरते मर्यादित नसून वर्षभरातील सर्व धर्मांच्या सण-उत्सवांना लागू राहतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सणांचा आनंद साजरा करताना नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे संरक्षण यांना प्राधान्य देण्याचा संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे.**



असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने फटाक्यांच्या निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातलेली नाही. मात्र, सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास मनाई असेल. या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकार, पोलीस आणि महापालिका प्रशासनाची असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला संयुक्तपणे जनजागृतीची नियमावली तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, समाजमाध्यमे तसेच शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून हरित फटाक्यांच्या वापराबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार प्रसिद्ध व्यक्तींची मदत घेण्याची सूचनाही न्यायालयाने केली आहे. बस, लोकल रेल्वे आणि सार्वजनिक ठिकाणी माहिती फलक लावण्यावरही भर देण्यात आला आहे.

धर्मांतरितांना आरक्षणाचा लाभ नाही....

हिंदू धर्मातून गैर-हिंदू धर्मात धर्मांतर करणारी व्यक्ती आपल्या पूर्वीच्या सामाजिक दर्जाच्या आधारावर आरक्षणाचा लाभ घेऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. ९ मार्च २०२७ रोजी, सरकारने मागासवर्गीय, अतिमागासवर्गीय, विमुक्त समुदाय आणि अनुसूचित जातीतील लोकांना इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर मुस्लिम मागासवर्गात समाविष्ट करण्याची परवानगी दिली होती. तथापि, मद्रास उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली, ज्याला नंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. तथापि, न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, हिंदू धर्मातून गैर-हिंदू धर्मात धर्मांतर करणारी व्यक्ती केवळ आपल्या पूर्वीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर संविधानाच्या कलम १६(४) अंतर्गत सकारात्मक कृतीचा दावा करू शकत नाही.

### बबनराव खोकराळे मृत्यू प्रकरण

## पोलिसांच्या तपासावर न्यायालयाचे ताशेरे!

- **तपासी अधिकारी, पोलीस अधीक्षकांना नोटिसा; निष्पक्ष तपास करून प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश**
- **शहरातील नामांकित डॉ. गोपाल बहुरूपी, डॉ. सुधीर बोरकर, डॉ. सचिन पांडुळे, डॉ. अक्षय झावरे, डॉ. मुकुंद तांदळे यांची होणार पुन्हा चौकशी**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बबनराव नारायण खोकराळे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाच्या तपासातील दिरंगाईवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पूर्वीच्या आदेशांचे पालन न केल्याने तपासी अधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना नोटिसा बजावण्याचे आदेश न्यायालयाने १४ ऑक्टोबर रोजी दिले. तसेच या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश पुन्हा दिले आहेत.




बबनराव खोकराळे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार १८ ऑक्टोबर २०२५ रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात डॉ. गोपाल बहुरूपी, डॉ. सुधीर बोरकर, डॉ. सचिन पांडुळे, डॉ. अक्षय झावरे आणि डॉ. मुकुंद तांदळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. सुरुवातीला या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्याकडे होता.तपास निष्पक्षपणे होत नसल्याचा आरोप करत फिर्यादी अशोक बबनराव खोकराळे यांनी ॲड. अनिकेत कुलाळ यांच्यामार्फत न्यायालयात दाद मागितली होती. त्यानंतर २८ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने डॉ. टिपरसे यांच्याकडून तपास काढून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपविण्याचे आदेश दिले होते. तसेच पोलीस अधीक्षकांनी तपासावर देखरेख ठेवून दर १५ दिवसांनी प्रगती अहवाल न्यायालयात सादर करावा, असे निर्देश दिले होते. मात्र, २ जानेवारी २०२६ रोजीच्या अहवालाव्यतिरिक्त तपासाचा अन्य प्रगती अहवाल सादर करण्यात आला नसल्याची बाब फिर्यादीच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. पोलीस अधीक्षकांकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने तपासातील हलगर्जीपणाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले. तसेच तपास योग्य, निष्पक्ष आणि प्रभावीपणे करण्याचे निर्देश पुन्हा दिले. या प्रकरणात संबंधित डॉक्टरांची पुन्हा चौकशी होणार असल्याने पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे.

# गोदावरीच्या पाण्यावरून श्रीरामपूर - वैजापूरमध्ये संघर्षाचा भडका!

## नागमठाण पुलावर हजारो शेतकरी आक्रमक; आत्मदहनाचा इशारा, वरच्या बंधाऱ्यांच्या फळ्या काढण्याचा पवित्रा

### १२० एमसीएफटी पाणी सोडूनही खालचे बंधारे कोरडे; जलसंपदा मंत्र्यांच्या निर्णयाकडे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** गोदावरी नदीपात्रात १२० एमसीएफटी पाणी सोडूनही पुणतांब्यापासून खालचे बंधारे कोरडेच राहिल्याने श्रीरामपूर आणि वैजापूर तालुक्यांतील शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. नाशिक पाटबंधारे विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे पाण्याचे समान वाटप झाले नसल्याचा आरोप करत हजारो शेतकऱ्यांनी गुरुवारी (दि. १५) म हांकाळवाडगाव-नागमठाण पुलावर सर्वपक्षीय आंदोलन सुरू केले. गोदावरी पात्रात पाणी येईपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार आंदोलकांनी केला असून, वरच्या बंधाऱ्यांच्या फळ्या काढण्याचा इशाराही दिला आहे. आजच्या श्रीरामपूर येथील टंचाई बैठकीत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तोडगा न काढल्यास आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.



श्रीरामपूर आणि वैजापूर तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या मागणीनंतर पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी नदीपात्रातील बंधाऱ्यांम ध्ये १२० एमसीएफटी पाणी सोडण्यात आले. मात्र, नाशिक पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील निफाड ते पुणतांबा दरम्यानचे दहा बंधारे पूर्ण क्षमतेने भरले असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील नाऊर, खानापूर, कमालपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील वांजरगाव (सरालाबेट) येथील बंधारे कोरडेच राहिले. त्यामुळे पाण्याच्या समान वाटपाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

वैजापूर तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष गणेश तांबे यांनी या परिस्थितीला नाशिक पाटबंधारे विभागाचा कारभार जबाबदार असल्याचा आरोप केला. अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर विभागात नियमांनुसार टप्प्याटप्प्याने बंधाऱ्यांच्या फळ्या टाकण्यात आल्या; मात्र नाशिक विभागात ऑगस्टमध्येच चार ते पाच फळ्या टाकल्याने वरून सोडलेले पाणी अडविणे तेथील शेतकऱ्यांना शक्य झाले, असे त्यांनी सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप न केल्याने आज संघर्षाची वेळ आल्याचा आरोपही त्यांनी केला.

आंदोलनाची तीव्रता वाढताच शेतकऱ्यांनी महंत रामगिरी महाराज यांची भेट घेऊन हस्तक्षेपाची विनंती केली होती. आंदोलनस्थळी आत्मदहनाचा इशारा देण्यात आल्याने पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला. आंदोलकांनी दोन ट्रॅक्टर-ट्रेलरमधून सरपण आणून ठेवल्याने पोलिसांसह अग्निशमन दलही सतर्क झाले होते.

शेतकरी संघटनेचे गणेश तांबे, स्वतंत्र भारत पक्षाचे श्रीरामपूर तालुकाध्यक्ष निलेश शेंडगे आणि महिला आघाडीच्या अध्यक्षा सुनिता वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. आमदार हेमंत ओगले यांनी पंधरा दिवसांपासून पाठपुरावा सुरू असल्याचे सांगत निर्णय न झाल्यास आंदोलनात सहभागी होण्याची ग्वाही दिली. वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांनीही (पान ४ वर)

## लाडक्या बहिणींचा अकोलेत संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**२६ ऑक्टोबरला 'वर्षा'वर धडकण्याचा इशारा**

**अकोले :** निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील मानधन बंद झाल्याने म हिलांचा संताप उफाळून आला आहे. ई-केवायसी आणि तांत्रिक त्रुटींच्या नावाखाली पात्र महिलांना योजनेतून वगळल्याचा आरोप करत गुरुवारी (दि. १५) अकोले तहसील कार्यालयावर हजारो महिलांनी मोर्चा काढला. बंद केलेले मानधन तातडीने सुरू करा, ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करा आणि दरम हा १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपये द्या, अशा मागण्या महिलांनी केल्या.अखिल भारतीय जनवादी महिला संघटना आणि किसान सभेच्या नेतृत्वाखाली रासने संकुल येथून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातून मार्गक्रमण करत मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. प्राची हतीवलेकर, प्रीती शेखर आणि किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांच्यासह विविध पदाधिकारी (पान ४ वर)

# संदीप उद्योग समूहावर आयकर विभागाची धाड!

### माजी महापौर संदीप कोतकर यांच्याशी संबंधित हॉटेल्स, कार्यालये आणि निवासस्थानी तपासणी; १२ तासांहून अधिक काळ झाडाझडती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील माजी महापौर संदीप कोतकर आणि ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्याशी संबंधित प्रसिद्ध संदीप उद्योग समूहावर आयकर विभागाने छापा टाकल्याने राजकीय आणि व्यावसायिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. पुणे येथील आयकर विभागाच्या पथकाने बुधवारी (दि. १४) सकाळी आठच्या सुमारास एकाच वेळी विविध ठिकाणी तपासणी सुरू केली.



रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती. या कारवाईमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

संदीप उद्योग समूहाची अहिल्यानगर शहरातील पुणे रस्त्यावर हॉटेल सचिन, हॉटेल उदयनराजे आणि संदीप प्राईड ही प्रसिद्ध हॉटेल्स आहेत. याशिवाय पुण्यातही या सम ूहाची हॉटेल्स कार्यरत आहेत. खाद्यपदार्थांच्या दर्जामुळे या हॉटेल्सना मोठी पसंती मिळत असल्याने शहरात या कारवाईची चर्चा रंगली आहे.आयकर विभागाच्या पथकांनी नियोजनबद्ध पद्धतीने विविध ठिकाणी तपासणी केली. समूहाशी संबंधित हॉटेल्स, कार्यालये आणि केडगाव येथील निवासस्थानी पथकांनी कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि डिजिटल माहितीची तपासणी केल्याचे समजते. हॉटेलच्या व्यवस्थापकाच्या निवासस्थानी तसेच समूहाशी संबंधित एका बांधकाम व्यावसायिकाच्या घरावरही छापे टाकण्यात आल्याची माहिती आहे.

या कारवाईत नेमकी कोणती कागदपत्रे किंवा आर्थिक व्यवहार तपासण्यात आले, तसेच करचुकवेगिरीसंदर्भात काही निष्पन्न झाले आहे का, याबाबत आयकर विभागाकडून अधिकृत तपशील समोर आलेला नाही. त्यामुळे या छाप्यांमागील (पान ४ वर)

# रब्बी सिंचनाच्या नियोजनाची कसोटी..!

## राज्यातील धरणांत गतवर्षापेक्षा २७९ टीएमसी पाणी कमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचे सावट गडद झाले असून, त्याचे प्रतिबिंब प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्यात उमटले आहे. राज्यातील सुमारे ३ हजार ३३ प्रमुख मोठ्या, मध्यम व लघु जलप्रकल्पांमध्ये १५ ऑक्टोबर २०२६ रोजी ७१.४८ टक्के म्हणजेच १ हजार ३०.५९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ९०.८४ टक्के म्हणजे १ हजार ३०९.७२ टीएमसी होता. त्यामुळे यंदा तब्बल २७९.१३ टीएमसी पाणी कमी आहे. या पार्श्वभूमीवर रब्बी आणि उन्हाळी हंगामातील सिंचनाचे नियोजन जलसंपदा विभागासाठी मोठी कसोटी ठरणार आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देतानाच शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे, असे मत जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त अभियंता व जलसंपत्ती अभ्यासक हरिश्चंद्र चकोर यांनी व्यक्त केले.

**पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे!**

**राज्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. १५ ऑक्टोबरच्या पाणीसाठ्याच्या आधारे रब्बी आणि उन्हाळी सिंचन कार्यक्रम निश्चित केला जातो. मात्र, यंदा पाणीसाठा कमी असल्याने सिंचनाच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पुढील ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी जलसंपदा विभागाला विशेष दक्षता घ्यावी लागेल. शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाण्याचा अपव्यय टाळावा, तर नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करावा. उपलब्ध पाणीसाठा आणि आगामी काळातील गरज यांचा ताळमेळ राखणे ही शासन, प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.**
**` इंजि. हरिश्चंद्र चकोर, जलसंपत्ती अभ्यासक व सेवानिवृत्त अभियंतासंपादकीय**

दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी धरणांमधील उपयुक्त पाणीसाठ्याचा आढावा घेऊन रब्बी हंगाम आणि उन्हाळी हंगामाच्या प्राथमिक सिंचन कार्यक्रमाची निश्चिती केली जाते. यंदा राज्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने या नियोजनावर दुष्काळाचे सावट आहे. राज्य शासनाने सुमारे ७५ टक्के तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून, आगामी पावसाळ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी जलसंपदा विभागाला विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

**मराठवाड्यात सर्वाधिक चिंताजनक स्थिती**

राज्यातील सहा महसुली विभागांच्या पाणीसाठ्याचा विचार करता कोकण विभागात सर्वाधिक ८८.४७ टक्के, तर पुणे विभागात ८२.४१ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. नाशिक विभागात ७९.६४ टक्के, नागपूर विभागात ६७.१६ टक्के आणि अमरावती विभागात ६०.३४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, मराठवाड्यातील धरणांमध्ये अवघा ४२.३३ टक्के पाणीसाठा असल्याने या विभागापुढील पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर बनले आहे. मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी



महत्त्वाच्या जायकवाडी धरणात एकूण पाणीसाठा ८४.७५ टीएमसी, म्हणजेच ८२.५० टक्के असल्याची माहिती देण्यात आली आहे. धरणात यंदा मोठ्या प्रमाणात पाणी आले असून, गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे. खरीप हंगामातील सिंचन, औद्योगिक वापर आणि बाष्पीभवनामुळेही पाणीसाठ्यात घट झाली आहे. उपलब्ध साठा लक्षात घेता सध्या सम न्यायी पाणीवाटप कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहूनही नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील धरणसमूहांतून जायकवाडीसाठी पाणी सोडण्याची आवश्यकता दिसत नसल्याचे चकोर यांनी स्पष्ट केले.

**अहिल्यानगरमध्ये ७४ टक्के पाणी; दक्षिण भागाची चिंता कायम**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या १३ प्रमुख प्रकल्पांमध्ये एकूण ३८.६३० टीएमसी, म्हणजेच ७४.१५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याचे चकोर यांनी सांगितले. मात्र, गतवर्षाच्या तुलनेत यंदा जिल्ह्यातील पाणीसाठा कमी आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागातील भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि आढळा या प्रमुख प्रकल्पांमध्ये सम ाधानकारक पाणीसाठा आहे. भंडारदरा आणि आढळा धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. निळवंडे धरणात ७१.२६ टक्के, तर मुळा धरणात ६९.७७ टक्के पाणीसाठा आहे. पिंपळगाव खांड धरणही पूर्ण क्षमतेने भरले आहे.

याउलट जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सीना, खैरी, मांडओहळ आणि घाटशीळ-पारगाव या प्रकल्पांमधील पाणीसाठा अत्यल्प आहे. सीना धरणात ३१.२१ टक्के, खैरीमध्ये १४.३८ टक्के, तर (पान ४ वर)

# साखर कारखानदारी वाचविण्यासाठी सक्षम 'मॉडेल' आवश्यक




साखर कारखानदारी हा राज्यातील प्रमुख कृषी प्रक्रिया उद्योग आहे. राज्यात जवळपास दोनशे सहकारी व खाजगी कारखाने आहेत. ग्रामीण भागात मोठा रोजगार ह्या कारखानदारीने दिला आहे. लाखो शेतकरी, कामगार, ऊसतोडणी मजूर, वाहतूकदार, व्यावसायिक यांचे हितसंबंध साखर कारखानदारीशी आहेत. एकूणच ग्रामीण अर्थकारणाशी निगडित हा विषय आहे. त्यामुळे सध्या अडचणीत सापडलेल्या साखर उद्योगाला सावरण्याची नितांत गरज आहे.

राज्य सरकारने राज्यातील साखर आयुक्त, सहकार विभाग आणि राज्य सहकारी बँकेने एकत्रित 'मॉडेल' तयार करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतचा अहवाल एका महिन्यात शासनाला सादर केला जाणार आहे. वास्तविक सदरच्या समितीमध्ये व्ही. एस. आय., ईस्मा, साखर संघ, शेतकरी व कामगार संघटनांचे प्रतिनिधींचाही समावेश असणे गरजेचे आहे, असे वाटते.

साखर कारखानदारी, विशेषतः सहकारी साखर कारखाने आर्थिक अरिष्टात अडकलेत, त्यांची कारणमीमांसा यानिमित्ताने झाली पाहिजे. अनेक कारखान्यांनी ऊस उपलब्धतेचा विचार न करता गाळपक्षमता वाढ केली. याकडे परवानगी देताना साखर आयुक्त यांनीही दुर्लक्ष केले. यामुळे हंगाम १८० दिवसांवरून ९० दिवसांवर आला. कारखाने कमी दिवस चालल्यामुळे उर्वरित काळात त्यांची उत्पादन क्षमता वापरात येत नाही. त्यामुळे कारखान्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे कठीण होत असून उद्योग आर्थिक संकटात सापडला आहे. परिणामी सहकारी साखर कारखाने अडचणीत येण्याचे प्रमाण वाढले आहे.

या पार्श्वभूमीवर काही सूचना आणि उपाययोजना यांचा विचार होणे आवश्यक ठरते. साखर उद्योग हा एकमेव उद्योग असा आहे की, ज्यात अंतिम उत्पादनापेक्षा कच्च्या मालाला अधिक भाव द्यावा लागतो. साखरेची एमएसपी २०१९ पासून ३१०० रुपये प्रतिक्विंटल, तर उसाची एफआरपी सरासरी ३८०० रुपये प्रतिटन असे व्यस्त प्रमाण आहे. साखरेची एमएसपी हे कारखानदारी तोट्यात येण्याचे मुख्य कारण आहे. यासाठी साखरेच्या दरासाठी उसाच्या एफआरपीशी निगडित सूत्र ठरले पाहिजे. आजमितीस उसदराचा विचार करता उसाची एफआरपी अधिक २५ टक्के असे सूत्र साखर दरासाठी निश्चित करावे.

याचप्रमाणे इथेनॉलसाठीही दर निश्चित केले पाहिजेत. इथेनॉल हे पेट्रोलमध्ये ब्लेंडिंग करून इंधन म्हणून वापरले जाते. याचा विचार करता इथेनॉलचे दर पेट्रोल दराशी निगडित असावेत, ही कारखानदारांची मागणी रास्त आहे. याचा विचार करता इथेनॉलच्या दरासाठी पेट्रोलच्या दराच्या ७५ टक्के असे सूत्र निश्चित करावे. याचा अर्थ पेट्रोलचे दर प्रतिलिटर १०० रुपये असेल, तर इथेनॉलला प्रतिलिटर ७५ रुपये दर दिला जावा. यामुळे कारखान्याचे अर्थकारण सुधारून ऊस उत्पादकालाही आर्थिक लाभ मिळेल.

ऊसतोडणी दर राज्यभर समान असले तरी ऊस वाहतूक दरात मात्र कारखानानिहाय तफावत आढळते. यात अनेक कारखानदार घोटाळे करतात. ऊस तोडणी व वाहतूक दर हा उसाच्या एफआरपीमधून वजा होऊन उर्वरित रक्कम उसाचे नक्त मूल्य म्हणून शेतकऱ्यास मिळते. याचा विचार करता ऊस वाहतुकीचे प्रतिकिलोमीटर दरही शासनाने निश्चित करावेत. निश्चित दरात जास्तीत जास्त २५ टक्के वाढ भौगोलिक स्थिती, पेट्रोल-डिझेल दरवाढ गृहीत धरून मान्य करावी. यामुळे ऊस वाहतूक दरात सुसूत्रता आणि समानता येईल.

राज्य सहकारी आणि जिल्हा सहकारी बँका ह्या साखरेच्या एसएमपीच्या ८५ टक्के नक्त मूल्य निश्चित करून कर्जपुरवठा करतात. सद्यस्थितीत ३१०० रुपये एसएमपी गृहीत धरून याच्या ८५ टक्के मालतारण कर्ज दिले जाते. यामुळे कारखान्यांना एफआरपी देण्यासाठी अन्य मार्गाने कर्ज काढावे लागते. ही मोठी समस्या असल्याने कारखाने तोट्यात जातात व कर्जबाजारी होतात. यासाठी साखरेच्या दराबाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. साखरेबाबतचा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा, ज्यावर केवळ चर्चा होते पण निर्णय होत नाही, तो म्हणजे साखरेच्या द्विस्तरीय दराचा. मानवी वापराव्यतिरिक्त साखरेचा मिठाई,हॉटेल,शीतपेये, आईस्क्रीम, कन्फेक्शनरी (चॉकलेट्स, गोळ्या, लॉलीपॉप), फार्मसी अशा उद्योग व्यवसायात मोठ्या प्रमाणावर वापर होतो. स्वस्त दरात साखर खरेदी करून प्रचंड नफेखोरी केली जाते. अशा वापरासाठीच्या साखरेचे दर हे मानवी वापराच्या साखर दरापेक्षा दुप्पट निश्चित करावेत. तसेच निश्चित केलेल्या दराने साखर खरेदी करणे बंधनकारक करावे. यासाठी काय उपाययोजना करता येईल, याचा शासनाने विचार करावा.

कारखानदार उसाची उपलब्धता विचारात न घेता अनावश्यक गाळपक्षमता वाढ, उपपदार्थ निर्मिती प्रकल्प यासाठी कर्जे काढतात. सदरचे प्रकल्प अपुऱ्या ऊस उपलब्धतेमुळे तोट्यात जाऊन कारखाने हकनाक कर्जबाजारी होतात. राज्याचा विचार करता कारखान्यांवर प्रतिवर्ष सरासरी ५० कोटी रुपये व्याजाचा बोजा पडतो. यासाठी राजकीय हितसंबंध न बघता, ऊस उपलब्धता बघूनच कर्जपुरवठा केला जावा. अनावश्यक कर्जावर निर्बंध घालावेत.

कर्जावरील व्याजदराचा विषय जो अत्यंत कळीचा मुद्दा आहे. साखर उद्योग हा कृषी प्रक्रिया उद्योग असल्याने ह्या उद्योगास सवलतीच्या दराने कर्जपुरवठा केला पाहिजे. सध्या तारण कर्जावर १२.८५ टक्के, तर भांडवली कर्जासाठी १३ टक्के व्याजदर आहे. साखर कारखान्यांना तारण कर्ज ५ टक्के, तर अन्य कर्जे ७ टक्के अशा सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा व्हावा. यामुळे कारखान्यांना आर्थिक दिलासा मिळेल.

सध्या राज्यातील ऊस क्षेत्र सुमारे पंधरा लाख हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. कारखान्यांची वाढती क्षमता आणि वाढलेली गाळपक्षमता यांचा विचार करता उसक्षेत्रात वाढ होणे क्रमप्राप्त आहे. यासाठी ऊस उत्पादकता वाढविणे, सूक्ष्म सिंचनाचा विस्तार करणे आणि ऊस विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे आवश्यक ठरते. या कामात साखर कारखान्यांच्या जोडीने कृषी व जलसंपदा विभागालाही सहभागी करून कालबद्ध योजना राबविल्यास त्याचा फायदा ऊस उत्पादक आणि साखर उद्योगाला होईल.

काळ कसोटीचा आणि साखर कारखानदारीच्या अस्तित्वाचा आहे. त्यामुळे अशा बिकट परिस्थितीत विसंवाद आणि राजकारणाऐवजी सुसंवादाची अधिक गरज आहे. कारण कारखाने टिकले तर काय राजकारण, सत्ताकारण असेल ते टिकेल. सत्ताकारण व राजकीय हितरक्षणापेक्षा आज शेतकरी, कामगार, ऊसतोडणी मजूर,वाहतूकदार,व्यावसायिक, व्यापारी यांचे हितरक्षण महत्त्वाचे आहे. या सर्वांचा विचार साखर कारखानदारीशी निगडित संबंधित घटकांनी करावा. तसेच शासननियुक्त प्रतिनिधी किंवा समितीने साखर कारखानदारीशी निगडित सर्व घटकांशी संवाद साधून समन्वयाने दीर्घकालीन सक्षम मॉडेल तयार करावे आणि साखर कारखानदारीला अरिष्टातून बाहेर काढावे.

# अशोकनगर येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील लोकनेते भानुदास मुरकुटे संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'वाचन प्रेरणा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची



गोडी निर्माण व्हावी आणि डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांचा जागर व्हावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल डॉ. संदीप सांगळे यांनी केले होते. या प्रदर्शनात साहित्य, विज्ञान, स्पर्धा परीक्षा, चरित्रे, आत्मचरित्रे अशा विविध विषयांवरील शेकडो पुस्तके विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आली होती. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला बचत गटांना स्वयंरोजगाराची नवी संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** ग्रामीण भागातील महिला बचत गटांना स्वयंरोजगाराची नवी दिशा मिळावी, महिलांच्या कौशल्यांना व्यावसायिक स्वरूप प्राप्त व्हावे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर व केंद्रीय औषधी व सुगंधी वनस्पती संस्था, लखनऊ यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सुगंधित मेणबत्ती व सुक्या फुलांपासून दागिने निर्मिती प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात महिलांना सुगंधित मेणबत्त्या तयार करण्याचे तंत्र, त्यासाठी लागणारा कच्चा माल, सुगंधांची निवड आणि आकर्षक स्वरूपातील मेणबत्त्यांची निर्मिती याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच सुक्या फुलांचा कलात्मक वापर करून विविध प्रकारचे आकर्षक दागिने तयार करण्याचे तंत्र प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह शिकविले जाणार आहे. परिसरातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले आहे.

# यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे यंदाचे सोनईरत्न पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** सोनई परिसरासह नेवासा तालुक्यात व अहिल्यानगर जिल्ह्यात सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतीक ,क्रीडा ,धार्मिक, आरोग्य, ग्रामविकास क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींना यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनई यांच्या वतीने सन २००२ पासून सोनई व परिसराच्या विकासात विविध माध्यमातून कार्यरत असलेल्या भूमिपुत्रांना सोनई रत्न पुरस्काराने गौरविले जाते.

यावर्षी नवरात्र महोत्सवात सोनई येथील जगदंबा देवी मंदिर सभागृहात सोमवारी दि.१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सोनईरत्न पुरस्काराने पाच व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेने व माजी मंत्री शंकरराव गडाख व प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२६ चे सोनईरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले असून सोनई परिसरातील सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी असणारे जेष्ठ नागरिक मंचच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवणारे शिवाशेठ बाफना यांना जाहीर करण्यात आला तसेच सोनई परिसरासाठी योगदान देणाऱ्या व सध्या हयात नसलेल्या व्यक्तींना माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या संकल्पनेतुन मरणोत्तर सोनईरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये स्व रामचंद्र(भाऊ) शेटे,स्व.मुरलीधर (आप्पा) बोरुडे,स्व.रामचंद्र उर्फ दादा वाघ (ड्रायव्हर)ांना जाहीर करण्यात आला असून पुरस्कार निवडीचे पत्र यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या घरी पुरस्कार निमंत्रणाचे पत्र प्रतिष्ठानच्या सदस्यासह पोहोच केले आहे सोमवार दि.१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या शुभहस्ते व माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.या पुरस्कार सोहळयाला सोनई व परिसरासह नेवासा तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांनी केले आहे.



सोनई रत्न पुरस्कार जाहीर झालेल्या व्यक्तींच्या घरी पत्र प्रदान करतांना युवा नेते उदयनदादा गडाख पाटील समवेत उपस्थित कार्यकर्ते नागरिक (छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

# 'घरपट्टी व पाणीपट्टी' पूर्णपणे माफ करा,

## नाईक खटोड नवले वाबळे यांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** राज्यात यंदा पावसाच्या अवकृपेमुळे अनेक भागांत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतातील पिके करपून गेल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, तर हाताला काम नसल्याने शेतमजूर व सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, आता स्थानिक प्रशासनाने व प्रत्येक ग्रामपंचायतीने नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची गरज असून, चालू वर्षाची 'घरपट्टी' आणि 'पाणीपट्टी' पूर्णपणे माफ करण्यात यावी, अशी मागणी श्रीरामपूर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण पाटील नाईक, बेलापूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रवींद्र खटोड, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, गावकरी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव वाबळे यांनी केली आहे. दुष्काळामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नसून ग्रामीण अर्थचक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पिण्याच्या पाण्याचा तुटवडा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. रोजच्या उपजीविकेचा प्रश्न समोर उभा असताना ग्रामपंचायतीचे विविध कर भरणे नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे, असे ते म्हणाले. 'जेव्हा संपूर्ण गाव दुष्काळाच्या झळा सोसत आहे, तेव्हा प्रशासनाने वसुलीचा तगादा न लावता जनतेला दिलासा दिला पाहिजे. शासनाने व प्रत्येक ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन चालू वर्षाची घरपट्टी आणि पाणीपट्टी तातडीने माफ करावी.'' दरम्यान ,प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या मासिक किंवा विशेष ग्रामसभेत घरपट्टी व पाणीपट्टी माफीचा विशेष ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवावा. ग्रामपंचायतींचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी राज्य शासनाने विशेष दुष्काळ निधीतून ग्रामपंचायतींना थेट अनुदान वर्ग करावे. तसेच कडक वसुलीस स्थगिती द्यावी. दुष्काळी परिस्थिती सुधारेपर्यंत कोणत्याही प्रकारची दंड आकारणी किंवा वसुलीचा तगादा लावला जाऊ नये. संकटाच्या काळात ग्रामपंचायत ही ग्रामीण जनतेचा पहिला आधार असते. त्यामुळे शासन व स्थानिक प्रशासनाने केवळ कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष कृती करून गावागावांतील जनतेला या करांमधून सूट द्यावी, अशी एकमुखी मागणी अरुण पाटील नाईक रवींद्र खटोड सुधीर नवले आणि वाबळे यांनी केली आहे.

# प्राणी-पक्ष्यांना पाणी, पुण्याईची कहाणी प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे प्राणी व पक्ष्यांना पाण्याची टंचाई जाणवत असताना, त्यांच्या तहानभागवण्यासाठी प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशन, श्रीरामपूर यांच्या वतीने 'प्राणी-पक्ष्यांना पाणी, पुण्याईची कहाणी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मागील वर्षी सुरू झालेल्या या उपक्रमाला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, प्राणी-पक्ष्यांप्रती दयाभाव निर्माण करण्यासह त्यांच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न संस्थेकडून केला जात आहे.

प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशन ही सामाजिक संस्था श्रीरामपूरसह राज्यभरात प्राणी व पक्ष्यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून परिसरातील पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी वापरात नसलेल्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा पुनर्वापर करून त्यामध्ये पाणी भरून झाडांवर टांगण्यात आले. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला.

तसेच भटक्या प्राण्यांसाठी विविध ठिकाणी लोकसहभागातून सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत. या टाक्या नियमित स्वच्छ ठेवून त्यामध्ये पाणी भरण्याची जबाबदारी स्वीकारू शकतील अशा नागरिकांच्या घरासमोरच त्या ठेवण्यात आल्या आहेत. श्रीरामपूर शहर व परिसरातील विविध भागांमध्ये अशा टाक्यांचे नियोजन संस्थेने केले आहे.

या उपक्रमात शहर व परिसरातील अनेक नागरिकांनी सहभाग घेतला. यामध्ये शरद कोतकर, मोरे सर, शिवाजी कलगुंडे, सिताराम कुऱ्हे, राजेश चुडीवाल, चंद्रकांत घाडगे, किशोर शिंदे, सुभाष उंडे, डॉ. हरीश बेनके, डॉ. पांडे, साधना साळुंके, लतिकागिरी, अनिकेत वराडे, विद्या वराडे, अर्जुन आदिक, प्रेरणा गुंजाळ, शारदा गुंजाळ, सुनील मानकर, संजय बंडगर, अनिल इंगळे, राजेश पाटणी, बेबी सोनावणे, सुभाष चौधरी आदींचा समावेश आहे.उन्हाळ्यातच नव्हे तर वर्षभर प्राणी व पक्ष्यांना स्वच्छ पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या घरासमोर किंवा परिसरात उपलब्ध जागेनुसार पाण्याची व्यवस्था करून मुक्या जीवांची तहान भागविण्यास हातभार लावावा, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा पल्लवी संजय आल्हाट यांनी केले आहे. तसेच या सामाजिक उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

# विद्युत अपघात भरपाई फलक लावण्यास महावितरणला वावडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर (शफीक बागवान)-** विद्युत अपघातात नागरिकाचा मृत्यू झाल्यानंतर संबंधित कुटुंबीयांना उपलब्ध असलेल्या आर्थिक मदतीची माहिती फलक लावण्यास महावितरण कंपनीला वावडे आहे.

महावितरणच्या प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३३, दिनांक ९ मार्च २०१६ नुसार, कंपनीच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त मानवाच्या जीवितास झालेल्या जीवघेण्या विद्युत अपघातासाठी देण्यात येणारी आर्थिक मदत २ लाखांवरून ४ लाख रुपये करण्यात आली आहे. ही तरतूद संचालक मंडळाच्या ठराव क्र. ५९०, दिनांक १२ जानेवारी २०१६च्या अनुषंगाने करण्यात आली होती.

या महत्त्वाच्या आर्थिक मदतीची माहिती सर्वसामान्य नागरिकांना कार्यालयीन पातळीवर सहज आणि ठळकपणे उपलब्ध नसेल, तर अपघातानंतर आधीच संकटात असलेल्या कुटुंबीयांना भरपाईची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, दावा प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क याबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात.

त्यामुळे प्रत्येक महावितरण कार्यालयात विद्युत अपघातातील आर्थिक मदत – नागरिकांसाठी माहिती या शीर्षकाचा स्वतंत्र माहितीफलक लावण्यास महावितरण ला अद्यापही वेळ मिळत नाही. फलकावर परिपत्रक क्रमांक व दिनांक, उपलब्ध आर्थिक मदतीची तरतूद, लागू अटी, दावा करण्याची प्राथमिक प्रक्रिया, संबंधित अधिकारी, कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक आणि अधिकृत ई-मेल यांची माहिती स्पष्टपणे देण्यात महावितरण कंपनीला अजूनही सवड मिळाली नाही.

विद्युत अपघातानंतर एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतो. त्या कुटुंबाला उपलब्ध असलेल्या अधिकृत आर्थिक मदतीची माहिती मिळविण्यासाठी कार्यालयीन हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये. महावितरणने ही माहिती पारदर्शकपणे कार्यालयाच्या दर्शनी भागात उपलब्ध करून द्यावी, साहेबराव वाबळे.
बेलापूर

# माका शिवारात वीजवाहिनीवरील तीन किलोमीटरच्या तारा चोरीला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर :** नेवासा तालुक्यातील माका गावाच्या शिवारात नवीन माका गावठाण वीजवाहिनीवरील ॲल्युमिनियमच्या तारा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. सुमारे १४ गाळ्यांमधील तीन किलोमीटर लांबीच्या तारा चोरीला गेल्याने महावितरणचे अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजण्यापूर्वी माका गावाच्या शिवारातील नवीन माका गावठाण वीजवाहिनीवरील तारा चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. वीजवाहिनीवरील ॲल्युमिनियमच्या तारा गायब असल्याचे लक्षात आल्यानंतर महावितरणच्या वतीने याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली. चोरट्यांनी तब्बल १४ गाळ्यांमधील तारा काढून नेल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे.

या प्रकरणी कुदन साहेबराव काळे (वय ४६, व्यवसाय खासगी कंत्राटदार, रा. देवगाव, ता. नेवासा) यांनी सोनई पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा नोंद क्रमांक ४५०/२०२६ आहे.

**पोलिसांकडून तपास सुरू**

सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन. आर. तुपे या प्रकरणाचा तपास करीत आहेत. वीजवाहिनीवरील तारा कोणी आणि कोणत्या पद्धतीने चोरल्या, याचा शोध पोलीस घेत आहेत. ग्रामीण भागात वीजवाहिन्यांवरील साहित्य चोरीच्या घटनांमुळे महावितरणच्या कामकाजावर आणि वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. माका येथील घटनेमुळे विद्युत साहित्याच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अर्जुन राऊत यांचा झोनल मॅनेजर कडून ट्रॉफी देऊन सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**टाकळीभान: :** तालुक्यातील टाकळीभान येथील गेल्या २४ वर्षापासून सातत्याने भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) ची विश्वासू व प्रामाणिकपणाने सातत्याने विमा सेवा देत असलेले विमा प्रतिनिधी अर्जुन भाऊसाहेब राऊत यांचा श्रीरामपूर एलआयसी शाखेतर्फे झोनल मॅनेजर (वेस्टर्न झोन) ट्रॉफी स्पर्धा जिंकल्याने ट्रॉफी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी श्रीरामपूर शाखेचे वरिष्ठ शाखाधिकारी नामदेव कानडे, विकास अधिकारी किरण बागुल यांच्या हस्ते त्यांना ट्रॉफीचे वितरण करण्यात आले. राऊत यांच्या यशाबद्दल टाकळीभान येथील महादेव यात्रा कमिटी, श्री राजेंद्र कोकणे मित्र मंडळ, शेतकरी संघटना व ग्रामस्थ यांच्यावतीने सत्कार करून या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सत्कार प्रसंगी माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, प्रा. कार्लस साठे सर, प्रा. जयकर मगर,भैय्या पठाण, गजानन कोकणे, बाबासाहेब तनपुरे, बंडोपंत बोडखे, काकासाहेब डिके, राजेंद्र शिंदे, मधुकर गायकवाड, विष्णुपंत पटारे, मिलिंद शेळके, बाळासाहेब खुरुद ,अरविंद साळवे तर शेतकरी संघटनेच्या वतीने सत्कार प्रसंगी भाजप उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल बोडखे, भाजपचे जिल्हा सचिव नारायण काळे, शेतकरी संघटना शाखा अध्यक्ष सुजित बोडखे, देविदास नाईक, नितीन वेताळ,गणेश वखरे, केरू जाधव, विलास नाईक आदी या प्रसंगी उपस्थित होते. सर्व उपस्थित यांनी राऊत यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# साई संस्थान कर्मचाऱ्यांना कायम सेवेचा न्याय

## निकालाचे श्रेय लाटण्यासाठी नेत्यांमध्ये चढाओढ

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबा संस्थानच्या ४८८ कर्मचाऱ्यांच्या कायम सेवेबाबत औरंगाबाद खंडपीठाने दिलेला ऐतिहासिक निर्णय आणि त्यानंतर राजकीय वर्तुळात रंगलेला श्रेयवादाचा सामना सध्या शिर्डीत चर्चेचा विषय ठरला आहे. न्यायालयीन लढाईचा हा टप्पा यशस्वी ठरल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. राजेंद्र पिपाडा, आ. प्रशांत बंब आणि आ. विवेक कोल्हे यांसारख्या प्रमुख नेत्यांनी हा निर्णय आपल्याच प्रयत्नांमुळे लागल्याचा दावा केला आहे. मात्र, या सगळ्या घडामोडींनंतर खरा विजय नक्की कुणाचा? कर्मचाऱ्यांच्या संघर्षाचा की भारतीय संविधानाने आणि न्यायव्यवस्थेने दिलेल्या न्यायाचा, असा कळीचा सवाल आता समोर आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कायम सेवेच्या प्रतीक्षेत असलेल्या या ४८८ कर्मचाऱ्यांनी न्यायालयात केलेली कायदेशीर लढाई अत्यंत खडतर होती. कायदेशीर तरतुदी, न्यायालयाचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांची अभेद्य एकजूट या पायावरच हा निकाल उभा आहे. असे असतानाही, निकाल घोषित होताच श्रेय लाटण्यासाठी स्थानिक नेत्यांमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळत आहे. पालकमंत्र्यांपासून ते स्थानिक लोकप्रतिनिधींपर्यंत प्रत्येकाने आपल्याच पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे सांगत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न चालवला आहे.

वस्तुतः शिर्डीच्या राजकीय संस्कृतीत संस्थानचा कोणताही निर्णय झाला की ''हा आमच्यामुळेच झाला'' असे दावे करण्याची पद्धत नवीन नाही; तोच जुना कित्ता याही वेळी गिरवला जात आहे. स्वतःचा दावा सिद्ध करण्यासाठी विविध नेत्यांकडून कामगार, वकीलांसमवेत फोटो, पत्रे आणि निवेदने दाखवून पुराव्यांची राजकीय धूळफेक केली जात आहे. तर दुसरीकडे, समर्थकांनी शहरात भलेमोठे बॅनर व फलकबाजी करून आपल्याच नेत्यामुळे कर्मचाऱ्यांना न्याय मिळाल्याचे लोकांच्या मनावर ठसवण्याचा धडाका लावला आहे.

मात्र, राजकीय नेत्यांकडून विकासकामांचे किंवा निर्णयांचे श्रेय घेणे एकवेळ समजण्यासारखे असले, तरी न्यायालयीन प्रक्रियेतील निकालाचे राजकारण करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न सुजाण नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. न्यायालये पुराव्यांच्या आणि कायद्याच्या कसोटीवर निर्णय देतात. त्यामुळे या विजयाचे खरे शिल्पकार हे न्यायालयाचा दरवाजा ठोठावणारे आणि वर्षानुवर्षे संघर्ष करणारे ते हतबल कर्मचारीच आहेत, ज्यांना संविधानाने न्यायाची शाश्वती दिली आहे.

या श्रेयवादाच्या शर्यतीत एक मोठी विसंगती प्रकर्षाने जाणवते. जर नेत्यांच्या तत्परतेने हा प्रश्न सुटणार होता, तर कर्मचाऱ्यांना कोर्टाचे उंबरठे झिजवण्याची वेळच का आली असती? जेव्हा निर्णय न्यायालयाच्या माध्यमातून येतो, तेव्हा त्याचे श्रेय लोकशाहीच्या मूल्यांना आणि संविधानालाच द्यायला हवे. नेत्यांनी सहकार्य केले असले तरी त्याला विजयाचे एकमेव कारण मानणे म्हणजे संविधानाच्या सर्वोच्च अधिकाराचे अवमूल्यन करण्यासारखे आहे. आता श्रेयवादाचे राजकारण बाजूला ठेवून, दावा करणाऱ्या सर्व राजकीय नेत्यांनी या कर्मचाऱ्यांचे सर्वांगीण भले कसे होईल आणि औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाचा तंतोतंत लाभ या कर्मचाऱ्यांपर्यंत कसा पोहोचेल, याचा गांभीर्याने बोध घेणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे तर, ४८८ कर्मचाऱ्यांचा हा विजय कोणत्याही एका नेत्याच्या कृपेचे फळ नसून तो संविधानाने दिलेल्या न्याय हक्काचा आणि कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ संघर्षाचा परिपाक आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## राज्यस्तरीय तंत्रज्ञान प्रश्न मंजुषा शुभम नरोडे, यशराज गुमास्ते पारितोषिक

**प्रवरानगर :** तांत्रिक ज्ञान, अचूक विचारशक्ती आणि प्रसंगावधान यांचा कस पाहणाऱ्या राज्यस्तरीय तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पॉलिटेक्निकच्या शुभम नरोडे आणि यशराज गुमास्ते या विद्यार्थ्यांनी १५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले . नाशिक आणि चांदवड येथील विद्यार्थ्यांनीही अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक), लोणी येथे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या प्रायोजकत्वाखाली राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यांत्रिकी अभियांत्रिकीच्या पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धेत विविध तंत्रनिकेतनांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## डॉ. भारतरत्न ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**सोनई :** स्व. तुकारामजी गडाख संचलित हनुमान ग्रामीण शिक्षण मंडळाचे पानसवाडी आदर्श विद्यालयात भारत रत्न, पद्मभूषण, ४० डॉक्टरेट डिग्री प्राप्त करणारे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



यावेळी प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक एस. पी.पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या विषयी मनोगत, सुंदर भाषा शैली, तडफदार आवाज, शब्द फेक, सादरीकरण हावभाव प्रस्तावना करून विद्यार्थ्यांनी सर्वांची मने जिंकली.माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक एस.पी.पवार यांनीही मौलिक मार्गदर्शन केले. उत्साहाच्या वातावरणामध्ये जयंती साजरी करण्यात आली.शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थीच्या मंगलमय वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.

## महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊ द्या : आ खताळ वणी येथील सप्तशृंगी मातेला प्रार्थना

**संगमनेर :** सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी आणि समाधान नांदावे, प्रत्येकाला आरोग्यसंपन्न जीवन लाभावे, तसेच सध्या महाराष्ट्रावर घोंघावत असलेल्या दुष्काळाच्या संकटाचे सावट लवकरात लवकर दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना आमदार अमोल खताळ यांनी वणी येथील श्री सप्तशृंगी मातेच्या चरणी केली. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठां पैकी अर्धपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील वणी येथील श्री सप्तशृंगी गडावर नवरात्रोत्सवानिमित्त आमदार खताळ यांनी परिवारासह भेट देऊन सप्तशृंगी मातेचे दर्शन घेतले आणि आशीर्वाद घेतले.यावेळी आमदार खताळ म्हणाले की, नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि श्रद्धेचा उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून असंख्य भाविक सप्तशृंगी मातेच्या दर्शनासाठी गडावर येतात. दर वर्षा प्रमाणे यंदाही आपण सप्तशृंगी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद मिळविण्यासाठी आलो आहोत. सध्या राज्यातील विविध भागांत पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या संकटामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांना या कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी बळ मिळावे, दुष्काळाचे संकट दूर व्हावे आणि त्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना आपण सप्तशृंगी मातेच्या चरणी केल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. दरम्यान, सप्तशृंगी देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार अमोल खताळ यांचा सप्तशृंगी मातेची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला

# वाघाचा आखाड्यात पाणीप्रश्न पेटला ; उपोषणाची दखल नाही,

## आंदोलकांनी पंचायत समितीचे प्रवेशद्वर केले बंद ; आत्मदहनाचा इशारा

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील वाघाचा आखाडा येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न चांगलाच पेटला आहे. गावाला पिण्याचे पाणी मिळावे, या मागणीसाठी सरपंच, उपसरपंच आणि महिलांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा गुरुवारी चौथा दिवस होता. मात्र, अद्यापही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी गुरुवारी सकाळी राहुरी पंचायत समितीचे मुख्य प्रवेशद्वर बंद केले. दरम्यान, उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याने संतप्त महिलांनी प्रशासनासमोर टाहो फोडत 'पाणी द्या, अन्यथा आत्मदहन करू!' असा इशारा दिला. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.



वाघाचा आखाडा गावात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. त्यातच दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गडद झाले आहे. गावाला नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, या मागणीसाठी सरपंच, उपसरपंच आणि महिलांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र, उपोषणाला चार दिवस उलटूनही मागणीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत असल्याने महिलांचा संताप अनावर झाला. त्यांनी प्रशासनासमोर आपल्या व्यथा मांडत पिण्याचे पाणी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली. पाणीप्रश्न तातडीने सोडवला नाही, तर आत्मदहन करण्याचा मार्ग स्वीकारू, असा गंभीर इशाराही संतप्त महिलांनी दिला.

प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी थेट राहुरी पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वरावर आंदोलन केले. प्रवेशद्वर बंद करून ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. गावाला पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही आणि पंचायत समितीचे कामकाज चालू देणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली. या आंदोलनामुळे पंचायत समिती परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत प्रश्नावर चार दिवसांपासून उपोषण सुरू असतानाही तोडगा निघत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, आंदोलनाची गंभीरता लक्षात घेऊन तहसीलदार डॉ. अमित पवार आणि पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी आंदोलकांशी संवाद साधला. यावेळी तहसीलदार डॉ. पवार यांनी ग्रामपंचायत आणि पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संवेदनशील असताना संबंधित यंत्रणांकडून हलगर्जीपणा होत असल्याचे निदर्शनास आल्याने तहसीलदारांनी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. आता प्रशासनाच्या सूचनांनंतरही वाघाचा आखाडा गावातील पाणीप्रश्न किती लवकर सुटतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. पिण्याचे पाणी ही मूलभूत गरज असताना त्यासाठी ग्रामस्थांना उपोषण आणि आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आता केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**वैद्यकीय तपासणीसाठी नकार**

उपोषण स्थळी उपोषणकर्त्यांनी सुरुवातीला वैद्यकीय तपासणीस नकार दिला परंतु तहसीलदार डॉ अमित पवार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख सहाय्यक गटविकास अधिकारी सुरेश तायडे यांनी उपोषणकर्त्यास वैद्यकीय तपासणी करण्याची विनंती केल्यावर उपोषणकर्त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला त्यानंतर महिला सरपंच निर्मला कटारे यांच्यासह दोन महिलांची प्रकृती बिघडली असल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले.

# अशोक कारखान्याच्या गळीत हंगामास प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** नियम व अटी अंमलबजावणी करून अशोक सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करण्यास प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील वरिष्ठ कार्यालयाने परवानगी दिली असल्याची माहिती नाशिक येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी अमित लाटे यांनी दिली. दरम्यान २३ ऑक्टोबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठामध्ये शेतकरी संघटनेने अशोक सहकारी साखर कारखान्यावर प्रशासक नेमावा, या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

अशोक सहकारी साखर कारखान्याच्या दूषित पाण्यामुळे शेतकऱ्याची सुमारे २५० एकर जमीन नापिक झाली, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी व साखर कारखान्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी कारेगाव येथील शेतकरी अर्जुन पटारे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे केली होती त्या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पथकाने प्रत्यक्ष पाहणी करून कारखान्याचा वीज पुरवठा व पाणी पुरवठा बंद करण्याचे आदेश दिले होते, साखर कारखान्याने दूषित पाणी ज्या ठिकाणी साठवले जात होते त्या ठिकाणी असलेले खड्डे बुजवावे, दरम्यान पाणी पुरवठा काही दिवस बंद होता परंतु वीज पुरवठा काही तांत्रिक अडचणीमुळे बंद करता आला नाही, ज्यावेळेस कारखान्याचा गळीत हंगाम सुरु होईल त्यावेळेस प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे कारखान्याला जे नियम व अटी घालून दिलेल्या होत्या त्याचे पालन केले किंवा नाही, हेही तपासले जाणार आहे, असे लाटे यांनी सांगितले. प्रदूषण नियंत्रण मंडळाने अहिल्यानगर जिल्ह्यातील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना यांची डिस्टलरी, नागवडे सहकारी साखर कारखाना यांची डिस्टलरी, साईकृपा शुगरचे दोन्ही युनिट, अशोक सहकारी साखर कारखाना यांच्यावर कारवाई केली, अशोक साखर कारखान्यावर कारवाई करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी पटारे यांनी केल्यानंतर अशोक कारखान्याच्या दूषित पाण्याची तपासणी करण्यात आली, त्यानंतर कारखान्याला नोटीस दिली असल्याचे त्यांनी सांगितले.प्रदूषण बोर्डाची नोटीस मिळाल्यानंतरही कारखाना चालू करण्यापूर्वी प्रशासनाने कुठलेही कारवाई केली .

नव्हती, या विषयावरून अशोक सहकारी साखर कारखान्याच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अर्जुन पटारे यांनी प्रश्न उपस्थित केला होता, वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर कारखाना प्रशासनाने कारेगाव परिसरात असलेले दूषित पाण्याचे खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले.

## रोल बॉल स्पर्धेत आत्मा मालिकची बाजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शालेय रोल बॉल स्पर्धेत आत्मा मालिक शैक्षणीक व क्रिडा संकुलाच्या दोन्ही संघांनी विजेतेपद पटाकावले. या संघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. विजेत्या खेळाडूंचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. श्रीरामपूर येथील सेंट झेवियर्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्या आयोजनातून ही शालेय रोल बॉल स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत आत्मा मालिक शैक्षणिक संकुलातील विविध विभागांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला त्यात आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलच्या ण-१४ व ण-१९ मुलांच्या संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विजेतेपद मिळवीले.

आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल विभागाच्या वतीने ण-१४ मुलींचा एक संघ, तसेच ण-१४, ण-१७ व ण-१९ मुलांचे प्रत्येकी एक संघ सहभागी झाले होते. इंग्लिश मीडियम विभागातून ण-१७ चा एक संघ, तर मराठी माध्यम विभागातून ण-१४ चे दोन संघ आणि ण-१७ चा एक संघ स्पर्धेत सहभागी झाला होता.

ण-१४ मुलींच्या संघाने द्वितीय व इंग्लिश मिडीयम स्कूल – ण१७ मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवीला. क्रीडा प्रशिक्षक दत्तात्रय भोसले यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## शहा येथील ७ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** शहा येथे २१.५० एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेला ७ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. आ. विवेक कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी सोडविण्यासाठी केलेल्या विशेष पत्रव्यवहार आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. या प्रकल्पामुळे चास उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना दिवसा अधिक सक्षम वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. या सौर ऊर्जा प्रकल्पातून ११ केव्ही वीजवाहिनीद्वरे ३३/११ केव्ही चास उपकेंद्राला वीज उपलब्ध होणार आहे. त्याद्वरे मंजूर, वडगाव, बक्तरपूर आणि मोर्विस या चार कृषी वीजवाहिन्यांना वीजपुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे चासनळी, मोर्विस, वडगाव, बक्तरपूर, मंजूर आणि हांडेवाडी या गावांतील शेतीपंप ग्राहकांना लाभ मिळणार आहे. शेतीपंपांना दिवसा वीज उपलब्ध होण्याबरोबरच वीजभाराचे नियोजन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. चास उपकेंद्रांतर्गत एकूण ३ हजार २८८ वीजग्राहक असून, त्यामध्ये १ हजार ६०३ शेतीपंप ग्राहक, १ हजार ४९७ घरगुती, १३४ व्यापारी, २४ औद्योगिक आणि ३० इतर ग्राहकांचा समावेश आहे. या भागात शेतीपंप ग्राहकांची ख्या मोठी असल्याने सौर ऊर्जा प्रकल्पामुळे कृषी वीजपुरवठ्याचे नियोजन सुधारण्याची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आ. विवेक कोल्हे यांनी संबंधित यंत्रणेकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे प्रकल्प कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे सहा गावांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

# गोवंशीय वाहतूक करणारा टेम्पो पकडला

## १७ जनावरांसह वाहन जप्त, एकाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** गोवंशीय जनावरांची चारा-पाण्याची पुरेशी व्यवस्था न करता वाहतूक केल्याच्या आरोपावरून लोणी पोलिसांनी कारवाई करत १७ जनावरे आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टाटा आयशर टेम्पो असा एकूण ११ लाख ९८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास राहाता तालुक्यातील निर्मळपिंपरी परिसरातील शिवरात नगर, मनमाड-सातलज हॉटेलसमोर हा प्रकार घडल्याची नोंद आहे. या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली.या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४१५/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मधील सुधारित तरतुदी तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास



प्रतिबंध करण्यासंबंधीच्या कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये १० काळ्या-पांढऱ्या रंगांच्या जर्सी गायी, तीन काळ्या रंगांच्या जर्सी गायी, दोन तांबड्या रंगांच्या जर्सी गायी आणि दोन काळ्या-पांढऱ्या रंगांचे गोऱ्हे अशा एकूण १७ जनावरांचा समावेश आहे. या जनावरांची अंदाजे किंमत २ लाख ९८ हजार रुपये आहे.

याशिवाय, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टाटा कंपनीचा १६१६ आयशर टेम्पो (क्रमांक चक-४७-इङ-१०३३), ज्याची अंदाजे किंमत नऊ लाख रुपये आहे, तोही पोलिसांनी जप्त केला आहे. अशा प्रकारे एकूण ११ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अशोक शशिकांत गाढे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार शकील अहमद शेख (वय ४४, रा. कुरेशी नगर, कसाईवाडा, कुर्ला, मुंबई) यांचे नाव आरोपी म्हणून नोंदविण्यात आले आहे. जनावरांची वाहतूक करताना त्यांच्या चारा-पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली नसल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. लोणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार साईनाथ राशिनकर करीत आहेत.

# सेवेला सर्वोच्च प्राधान्य द्या : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** तुम्ही तुमच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली, तर पैसा आपोआप तुमच्याकडे चालत येतो. त्यामुळे पैशाला नव्हे, तर सेवेला सर्वोच्च प्राधान्य द्या. आपल्या कामात प्रावीण्य मिळवण्याची जिद्द आणि सेवाभाव कायम ठेवल्यास यशाचा मार्ग निश्चितच सुकर होतो, असे प्रतिपादन अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले.

प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) च्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने सिंधू हॉल येथे आयोजित डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील उपस्थित होते. तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (छत्रपती संभाजीनगर) उपसंचालक डॉ. मोनिका घुगे (सानप), विश्वस्त ध्रुव विखे पाटील, कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे, कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे, प्राचार्य डॉ. आर. के. सिन्हा आदी मान्यवर उपस्थित होते.

मुम्मका सुदर्शन पुढे म्हणाले, आई, वडील आणि गुरू हेच आपल्या जीवनातील मुख्य मार्गदर्शक असतात. गुरू केवळ ज्ञान देत नाहीत, तर जीवनाला योग्य दिशा आणि प्रेरणा देतात. विखे पाटील कुटुंबीयांच्या मूल्यांचा गौरव करताना ते म्हणाले की, डॉ. राजेंद्र विखे पाटील आणि ध्रुव विखे पाटील हे आपल्या पूर्वजांचा, विशेषतः वडील व आजोबांचा ज्या आदरभावाने गौरव करतात, हे संस्कार अत्यंत कौतुकास्पद आहेत. मोठ्या व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेऊन समाजसेवा करण्याचा डॉ. कलाम यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.



कार्यक्रमात बोलताना डॉ. मोनिका घुगे म्हणाल्या, फळलीया तरूची शाखा, सहजी भूमिसी उतरे याप्रमाणे अफाट ज्ञान आणि कर्तृत्व असूनही डॉ. कलाम यांच्या ठायी असीम नम्रता होती. त्यांचे साधे राहणीमान आणि उच्च विचार आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी लावलेल्या जनसेवेच्या रोपट्याचा पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीने आज एक भव्य वटवृक्ष झाला आहे. त्यांनी सहकार, शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात दिलेले योगदान भावी पिढ्यांसाठी कायम मार्गदर्शक ठरेल.

यावेळी डॉ. प्रदीप बोरकर संपादीत फिजिओथेरपी कॉलेजच्या पॅराडाईम या वार्षिक मासिकाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला प्राचार्य डॉ. आर. के. सिन्हा यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल अर्वा दरेकर, सानवी साळुंके, निमिष घोलप, हर्षमीत सिंग सतनाम सिंग चुग,डॉ.प्रीती जावरे,डॉ.ध्रुवी सत्रा यांना पारितोषिके देवून गौरवीण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुषी झा व निमिश घोलप यांनी केले, तर डॉ. दिपाली हांडे यांनी आभार मानले. या सोहळ्याला विद्यापीठातील प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## आश्वी येथे अल्पवयीन मुलीचे कारमधून जबरदस्तीने अपहरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ।** सोशल मीडियावरील इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत एका अल्पवयीन मुलीचे कारमधून जबरदस्तीने अपहरण करून तिच्याशी लज्जास्पद वर्तन केल्याची खळबळजनक घटना आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे.

मात्र, स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे आणि संशयित कारचा पाठलाग केल्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. याप्रकरणी संशयित व्यक्तीविरोधात आश्वी पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आश्वी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील एका गावातील अल्पवयीन मुलीची सुमारे पाच महिन्यांपूर्वी इन्स्टाग्रामवर एका व्यक्तीशी ओळख झाली होती. मंगळवारी (दि. १३) सकाळी ही मुलगी रस्त्याने पायी जात असताना, आरोपी पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून तिच्याजवळ आला. त्याने मुलीला कारमध्ये बसण्याचा आग्रह केला. मुलीने त्याच्यासोबत जाण्यास स्पष्ट नकार दिल्यानंतर आरोपीने तिच्याशी अश्लील व लज्जास्पद वर्तन करत बळजबरीने तिला कारमध्ये बसवले. आरोपीने माझ्याशी लग्न कर असा मुलीवर दबाव आणत नकार दिल्यानंतरही कार वेगाने संगमनेरच्या दिशेने पळवली.

हा संशयास्पद प्रकार आणि कारमधील मुलीची हालचाल काही स्थानिक नागरिकांच्या वेळीच लक्षात आली. नागरिकांनी कसलाही विलंब न लावता तात्काळ आपल्या वाहनांवरून त्या स्विफ्ट कारचा पाठलाग सुरू केला. पाठलाग होत असल्याचे लक्षात येताच आरोपीने पुढे जाऊन गाडी थांबवली आणि मुलीला रस्त्यावर उतरवून संगमनेरच्या दिशेने सुसाट पळ काढला.

या धक्कादायक प्रकरणाबाबत आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २१६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), ७४, ८७, ३५१(२)(३), ३५२ तसेच 'पोक्सो' कायद्याच्या कलम ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून पसार झालेल्या आरोपीच्या शोधासाठी विशेष तपास पथके रवाना करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# शिर्डीत साई भक्तांसाठी ३०० डिजिटल लॉकर सुविधेचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून लाखो भाविक शिर्डीत येत असतात. साई मंदिरात दर्शनासाठी जाताना मोबाईल फोन नेण्यास बंदी असल्याने भाविकांची नेहमीच गैरसोय होत होती. यापूर्वी भाविकांचे महागडे मोबाईल साध्या कापडी पिशव्यांमध्ये जमा करून घेतले जात होते. त्यामुळे मोबाईलच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत होता. ही अडचण लक्षात घेऊन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने भाविकांसाठी अत्याधुनिक डिजिटल लॉकर सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

या सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार सर्व संचालक मंडळ आणि श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या सहकार्याने बेंगलोर येथील टकिट कंपनीच्या माध्यमातून श्री साई मंदिराच्या प्रवेशद्वर क्रमांक चार जवळ तीनशे डिजिटल लॉकरची सुविधा उभारण्यात आली आहे. या सुविधेचा शुभारंभ नुकताच श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके , मंदिर सुरक्षा प्रमुख रोहिदास माळी, गणेश सोनवणे यांच्यासह सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार आणि सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून ही डिजिटल लॉकर सुविधा कशी कार्य करते याची माहिती जाणून घेतली. त्यांनी स्वतःचा मोबाईल लॉकरमध्ये ठेवून या प्रणालीची पाहणी केली आणि कमीत कमी वेळेत आणि अगदी सोप्या पद्धतीने भाविकांना मोबाईल जमा करता येईल व परत घेता येईल यासाठी काही सूचना देखील दिल्या. ावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी गाडीलकर म्हणाले की साईबाबा संस्थानचे काम हे आदर्शवत आहे. भाविकांचे दर्शन सोयीस्कर व्हावे यासाठी संस्थानच्या जवळपास पंच्याऐंशी टक्क्यांहून अधिक सेवा जसे की दर्शन, आरती पास, निवास व्यवस्था या सर्व ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. याच आदर्शाचा वारसा घेत कर्मचारी सोसायटीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल पेमेंटच्या आवाहनाला प्रतिसाद देत ही डिजिटल लॉकरची सुविधा निर्माण केली आहे, जी भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सोसायटीचे कामकाज अत्यंत चांगले असून ती भक्तांना सुविधा देण्यासोबतच आपल्या सभासदांच्या हिताकडेही लक्ष देते, अशा शब्दात त्यांनी चेअरमन विठ्ठल पवार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या की लाखो साई भक्त शिर्डीत येतात आणि त्यांच्याकडे लाखो रुपये किमतीचे मोबाईल असतात. त्यांची सुरक्षा व्हावी आणि भक्तांचा विश्वास कायम राहावा यासाठी ही लॉकर पद्धत अत्यंत व्यवस्थितपणे सुरू केली आहे. ना . राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीकर आणि साईबाबा संस्थान नेहमीच एकत्रितपणे काम करत आहोत. विठ्ठल पवार साहेब आणि त्यांची टीम नेहमीच सोसायटीच्या माध्यमातून भक्तांना चांगली सुविधा देत असते, आज डिजिटल युगात त्यांनी डिजिटल लॉकरकडे जाण्याचा निर्णय घेतला हे कौतुकास्पद आहे, असे त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### रब्बी सिंचनाच्या नियोजनाची कसोटी..!

मांडओहळमध्ये अवघा १६.९५ टक्के पाणीसाठा आहे. घाटशीळ-पारगाव प्रकल्पात सध्या पाणीसाठा शिल्लक नसल्याची नोंद आहे. त्यामुळे दक्षिण अहिल्यानगरमधील शेतीसाठी आगामी काळात पाणी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान उभे राहू शकते. दक्षिण अहिल्यानगरच्या सिंचनासाठी महत्त्वाच्या पुणे जिल्ह्यातील घोड आणि कुकडी प्रकल्पसमूहांमध्ये समाधानकारक पाणीसाठा असल्याने काही प्रमाणात दिलासा मिळण्याचीशयता आहे. मात्र, स्थानिक प्रकल्पांतील घटता साठा लक्षात घेता पाण्याचे नियोजन काळजीपूर्वक करावे लागणार आहे.

भोजापूरच्या पाण्याने दुष्काळी भागाला दिलासा संगमनेर तालुयातील निमोण-तळेगाव परिसरासाठी महत्त्वाच्या भोजापूर धरणात सुमारे ९४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशाने आणि संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नांतून धरणातून अंदाजे ७८३ दशलक्ष घनफूट पाणी कालव्याद्वारे सोडण्यात आले. या पाण्याचा उपयोग लघुपाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव तसेच दगडी आणि काँक्रीट बंधारे भरण्यासाठी करण्यात आला. त्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या प्रश्नावर काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये सुमारे ९४.६२ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असल्याने या भागातील पाणीपुरवठ्याबाबत तूर्तास दिलासादायक स्थिती आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत झालेल्या पावसामुळे गोदावरी नदीपात्रातून जायकवाडीकडे मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले.

पुणे विभागात पुरेसे पाणी पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसमूहात ८८.१८ टक्के पाणीसाठा आहे. उजनी धरणात ९१.१३ टक्के, तर कोयना धरणात ८७.३५ टक्के पाणी उपलब्ध आहे. गोसीखुर्द धरण पूर्ण क्षमतेने भरले असले, तरी पेंच धरणातील पाणीसाठा ४४.६४ टक्के आहे. विदर्भ, अमरावती आणि मराठवाड्यातील काही भागांत पावसाचे प्रमाण असमाधानकारक असल्याने आगामी काळात परतीच्या पावसाकडे लक्ष लागले आहे.

### गोदावरीच्या पाण्यावरून श्रीरामपूर - वैजापूरमध्ये संघर्षाचा भडका !

अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाण्याचे समान वाटप झाले नसल्याचा आरोप केला. आता जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्या बैठकीत काय निर्णय होतो, याकडे दोन्ही तालुयांतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. पाणीवाटपाचा तिढा तातडीने सुटला नाही, तर गोदावरीच्या पाण्यावरून संघर्ष आणखी चिघळण्याची शयता आहे.

### संदीप उद्योग समूहावर आयकर विभागाची धाड!

कारण आणि तपासाचा निष्कर्ष याबाबतची उत्सुकता कायम आहे. हेलिकॉप्टर खरेदीच्या चर्चेमुळे उत्सुकता कोतकर कुटुंबीयांनी अलीकडेच दोन हेलिकॉप्टर खरेदी केल्याची चर्चा व्यावसायिक आणि राजकीय वर्तुळात सुरू होती. त्यामुळे आयकर विभागाच्या या कारवाईकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

### लाडया बहिणींचा अकोलेत संताप

आंदोलनात सहभागी झाले.निवडणुकीपूर्वी आश्वासने दिली; आता आमचे पैसे का रोखले? असा सवाल उपस्थित करत महिलांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. घरकाम, शेती, पशुपालन आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांना मिळणारे हे मानधन त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी महत्त्वाचे असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

मोर्चानंतर तहसीलदार सिद्धार्थ मोरे आणि महिला व बालविकास अधिकारी केडर नागरे यांना निवेदन देण्यात आले. पात्र महिलांचे मानधन पुन्हा सुरू करावे, थकीत रक्कम द्यावी आणि जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

२६ ऑटोबरपर्यंत प्रश्न न सुटल्यास मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानाबाहेर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. त्यामुळे लाडया बहिणींच्या नाराजीवर सरकार काय तोडगा काढणार, याकडे लक्ष लागले आहे.

# पानोडीच्या शेतकऱ्याचा ३ एकर २० गुंठे ऊस जळून खाक!

## वीजवाहिनीतील स्पार्किंगमुळे आग लागल्याचा आरोप; ६ लाख ७२ हजारांचे नुकसान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील प्रगतशील शेतकरी विक्रम शिवाजीराव थोरात यांच्या शिबलापूर शिवारातील उसाच्या शेताला बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) दुपारी साडेचारच्या सुमारास आग लागून ३ एकर २० गुंठे क्षेत्रावरील ऊस जळून खाक झाला. या आगीत सुमारे २१० टन उसाचे नुकसान झाले असून, त्याची किंमत अंदाजे ६ लाख ७२ हजार रुपये आहे. शिबलापूर येथील नव्याने उभारलेल्या वीज उपकेंद्रातील चाचणीदरम्यान वीजवाहिनीमध्ये स्पार्किंग होऊन ठिणगी उसाच्या शेतात पडल्याने आग लागल्याचा आरोप करण्यात येत आहे.

विक्रम थोरात यांनी गट क्रमांक १०३/१ व १०३/२ मधील क्षेत्रावर उसाची लागवड केली होती. मशागत, खते, औषधे आणि पाण्यासाठी मोठा खर्च करून त्यांनी पीक जोपासले होते. ऊस चांगला वाढला असल्याने त्यातून उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, अचानक लागलेल्या आगीमुळे संपूर्ण पीक जळाल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.शिबलापूर येथील वीज उपकेंद्रात चाचणी सुरू असताना वीजवाहिनीमध्ये स्पार्किंग झाल्याची चर्चा असून, त्यातून ठिणगी पडल्याने आग लागल्याचा आरोप आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अधिकृत तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

घटनेची माहिती मिळताच संगमनेर नगरपालिकेचे अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. शिबलापूरचे सरपंच तसेच हौशीराम पाबळ यांच्यासह स्थानिक युवकांनीही घटनास्थळी धाव घेतली. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना ही घटना घडली आहे. जळालेल्या उसामुळे उत्पन्नासोबतच जनावरांच्या चाऱ्याचेही नुकसान झाले आहे. उसाचा प्रतिटन ३ हजार २०० रुपये दर गृहीत धरल्यास नुकसानीचा प्राथमिक अंदाज ६ लाख ७२ हजार रुपये आहे. या घटनेचा तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त शाळेला १०० पुस्तके भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** भारतरत्न, मिसाईल मॅन व माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे ज्येष्ठ मार्गदर्शक व माजी पोलीस पाटील वसंतराव मुठे पाटील यांनी मुठे वडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल, जे.टी.एस. शाखेला १०० पुस्तके सस्नेह भेट दिली. यावेळी मुख्याध्यापक काशिद सर, गर्जे मॅडम व शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




वसंतराव मुठे पाटील यांनी डॉ. बाबुराव उपाध्ये लिखित जीवन हे अनमोल, ह्या मन मंदिरातून, आठवणीतील देवमाणसं, वैभवशाली श्रीरामपूर, अमृतमंथन, वाचता वाचता तसेच पुंडलिक गवंडी कुमावत लिखित आपले पंतप्रधान, नरेंद्रजी मोदी, आई यांसह विविध लेखकांची १०० पुस्तके शाळेला भेट दिली.

मुख्याध्यापक काशिद यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी शंकरराव पवार, जानराव दादा, शशिकांत थोरात, संदीप वलटे, लालझडे, संजय मुठे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# शारदोत्सवात 'सोशल मीडियावर बोलू काही'तून जनजागृती



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महिला मंडळ, श्रीरामपूरच्या शारदोत्सवानिमित्त 'सोशल मीडियावर बोलू काही' हा विनामूल्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संगीत, नृत्य, नाटिका, पथनाट्य, संवाद व भारूड अशा विविध कलाप्रकारांतून सोशल मीडियाच्या वापराबाबत जनजागृती करण्यात आली.महिला मंडळाचा पदाधिकारी ग्रुप, वंदे मातरम् ग्रुप, आदर्श जैन बहू मंडळ, वीरा ग्रुप, सर्व शाखीय ब्राह्मण महिला मंडळाचा रिल्स स्टार ग्रुप, डॉक्टर्स ग्रुप आणि महिला मंडळ श्रीरामपूर कार्यकारिणी ग्रुप यांनी सादरीकरण केले. मनोरंजनाची साधने, कौटुंबिक जीवन, ऑनलाइन शॉपिंग, रील्सचे मायाजाल, स्क्रीन टाइमचे आरोग्यावरील परिणाम तसेच महिला व मुलांवरील दुष्परिणाम , सोशल मीडियाद्वारे होणारे महिला आणि युवतींवरील आघात, सोशल मीडिया संवादाचे प्रभावी माध्यम या विषयांवर प्रकाश टाकण्यात आला.कार्यक्रमाचे नाट्यस्वरूपातील सूत्रसंचालन स्मिता जोशी व प्रीती आगाशे यांनी केले. मंडळाच्या प्रमुख विश्वस्त ज्योती भळगट व सचिव स्मिता जोशी यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. इतर पदाधिकारी व विश्वस्तांनी सहकार्य केले. अध्यक्षा रमा पोफळे व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सहभागी कलाकारांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

# भर दिवसा धूम स्टाईल चोरी, सोन्याचे लॉकेट पळवले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरात भरदिवसा दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील १ लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे लॉकेट बळजबरीने हिसकावून नेल्याची खळबळजनक घटना बुधवारी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे शहरात मोठी दहशत पसरली असून, दिवसेंदिवस वाढणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, अनुराधा यशवंत कुलकर्णी (वय ५८, रा. शासीनगर, वैजापूर) या आणि त्यांची मैत्रीण शुभाधा मोहरील या दोघी वैजापूर शहरातून भजनासाठी रेषेने जात असताना ही घटना घडली. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास नवरंग कपड्यांच्या दुकानासमोरून जात असताना, काळ्या रंगाच्या टी.व्ही.एस. कंपनीच्या मोटारसायकलवर दोन इसम गॉगल व टोपी घालून अचानक त्यांच्यासमोर आले. त्यापैकी दुचाकी चालकाने व पाठीमागे बसलेल्या इसमाने संगनमत करून अनुराधा कुलकर्णी यांच्या गळ्यातील १ लाख ४० हजार रुपये किमतीचे २२.६ ग्रॅम वजनाचे जुने वापरते सोन्याचे लॉकेट जोरात हिसकावून घेतले.

या अचानक झालेल्या झटक्यामुळे धक्का लागल्यामुळे त्या खाली पडल्या आणि त्यांनी तात्काळ "चोर चोर" असा मोठा आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकून काही स्थानिक लोक चोरांच्या मागे धावले आणि आरडाओरडा केला, परंतु चोरांनी तेथून पळ काढला. विशेष म्हणजे, याच चोरांनी काही मिनिटांपूर्वीच म्हासोबा चौक, वैजापूर येथे एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोने ओढल्याचे समोर आले असून, एकाच दिवशी शहरात दोन ठिकाणी अशा जबरी चोऱ्या झाल्याचे उघडकीस आले आहे.

दिवसाढवळ्या घडलेल्या या थरारक प्रकारामुळे वृद्ध महिला प्रचंड घाबरल्याने आणि त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना सर्वप्रथम उपचारासाठी दवाखान्यात हलवण्यात आले. त्यानंतर कुटुंबीयांसह त्यांनी वैजापूर पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्वरित शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता, शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरांनी धुमाकूळ घातल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

**चोरांचे हुलिया –**
चालक निळ्या रंगाचा शर्ट, काळी पँट, डोळ्याला गॉगल, डोक्यावर टोपी आणि पांढरे शूज घातलेला होताआणि पाठीमागे बसलेला इसम हा पांढऱ्या-निळ्या रंगाचा शर्ट व काळी पँट घातलेला होता.महिलाने स्पष्ट दावा केला की ते समोर आले तर नक्की त्यांना मी ओळखेल.

# जीवनात कर्मानुसार फळ पदरात पडते : संदिप महाराज बनसोडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** जीवनात सत्कर्माला विशेष महत्व असुन जगताना चांगले कर्म केले तर कर्मानुसार फळ पदरात पडत असते असा उपदेश संदिप महाराज बनसोडे यांनी माळवाडगांव येथे भवानी देवी मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी पारायण नवरात्र उत्सव सोहळ्यातील प्रारंभीच्या किर्तनातून भाविकांना केला.

माळवाडगांव येथील जागृत भवानी देवी मंदिरांच्या प्रांगणात सालाबादप्रमाणे यंदाही ५१ वे वर्षी ज्ञानेश्वरी पारायण किर्तन महोत्सव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

किर्तन महोत्सवाचे प्रारंभीच्या किर्तन सेवेकरिता जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या "घेईन मी जन्म याच साठी देवा"
या पाच चरणाच्या अभंगावर भाविकासमोर निरूपणपर उपदेश करताना संदिप महाराज बनसोडे पुढे म्हणाले की

अभंगातून संत तुकाराम महाराज पांडुरंग परमात्म्याला म्हणतात तुझी चरण सेवा घडण्यासाठी मी पुन्हा जन्म घेईन देवा मला पुन्हा जन्म दे, जर जीवनाच्या अखेरीस चांगलं कर्म शिल्लक असेल तर जन्म घेण्याची गरज नाही.जन्माला यावचं लागतं. जीवनात सत्कर्माला विशेष महत्त्व असुन जगताना चांगले कर्म केले तर कर्मानुसार फळ पदरात पडते.

जगाच्या पाठिवर ज्ञानेश्वरी एकमेव ग्रंथ असा आहे की ज्ञानेश्वरी पारायण वाचन केले तरी पुण्य सुखशांती मिळते.मानवी जीवनाला योग्य दिशा देणारा ज्ञानेश्वरी ग्रंथ आहे.
जीवनातील असंख्य प्रश्नांची उत्तरे या ग्रंथात सापडतात. प्रत्येकाने ज्ञानेश्वरीचे वाचन चिंतन अन् आचरण केले पाहिजे. भगवंताचे सदैव नामस्मरणात मन शुध्द होऊन दोष दूर जातात.सकारात्मक विचारांची वृध्दी होऊन भक्ती सदाचाराला हृदयात स्थान मिळते.

दोषाचा हिशोब करण्यासाठी अन् सज्जनांची गुढी उभारण्यासाठी आदी शक्ती भवानी मातेने जन्म घेतला. नवरात्र उत्सवात महिषासुराचा वध करत अधर्माचा नाश करून धर्माचे रक्षण केले.

या सोहळ्यास चंद्रकांत महाराज सावंत, कैलास महाराज दुशिंग, विठ्ठल महाराज सावकारे, प्रसाद गायकवाड,प्रदिप गाडे, तुळशीराम कापसे, रामभाऊ महाराज मुठे,यांच्यासह पंचक्रोशीतील गावोगावचे पुरूष महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**
My Old name- Akash parashram umbarkar And New name- Aakash parashram umbarkar as in my Aadhar card 6455 4605 6368

# दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी सर्वांनी उभे राहावे : आ खताळ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर |** दुष्काळात बळीराजा चांगलाच संकटात सापडला आहे. अशा कठीण परिस्थितीत राज्य शासन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र, केवळ शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता समाजातील प्रत्येक घटकाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भावना ठेवली पाहिजे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी सर्वांनी आपापल्या परीने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही आमदार खताळ यांनी केले.

देवी गल्लीतील सप्तशृंगी माता मंदिरामध्ये नवरात्रोत्सवा निमित्त आमदार अमोल खताळ व पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते सप्तशृंगी मातेची महाआरती करण्यात आली त्यावेळी भाविक भक्तांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की हिंदू धर्ममध्ये नवरात्रोत्सवाला खूप महत्त्व आहे. या उत्सवाच्या निमित्ताने देवीच्या दर्शनातून भक्तांना ऊर्जा, श्रद्धा आणि सकारात्मकतेची प्रेरणा मिळते. वणी येथील सप्तशृंगी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतल्यानंतर संगमनेरच्या देवी गल्लीतील जागृत देवस्थान असलेल्या सप्तशृंगीची महाआरती करण्याचा मान मिळाला, हे मी माझे परमभाग्य समजतो, अशी भावना आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली.
सर्वांना सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि संपन्न जीवन लाभावे, तसेच प्रत्येकाच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात, अशी प्रार्थना करत सध्या सर्व महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट ओढवले असून, या संकटातून बाहेर पडण्यासाठी शक्ती सप्तशृंगी मातेने द्यावी असे सांगून ते म्हणाले की
मंदिराच्या नूतनीकरणाचे आणि विकासाचे काम अनेक दिवसांपासून सुरू होते. आता हे काम पूर्णत्वाकडे जात असल्याने मनस्वी आनंद होत असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

यावेळी आमदार अमोल खताळ आणि नीलम खताळ यांचा मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड श्रीकांत गोंगे, माजी नगरसेवक शिरीष मुळे यांच्यासह देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. प्रशांत बंब यांच्या पाठपुराव्याला यश

## संजय गांधी निराधार योजनेतील जाचक अटी रद्द

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ मिळवताना जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला (ढ.उ.) सादर करण्याची अट अनेक गरजू लाभार्थ्यांसाठी अडचणीची ठरत होती. ही अट शिथिल करून पात्र लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांनी शासनाकडे लेखी पत्राद्वारे केली होती. या मागणीच्या अनुषंगाने शासनाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याने लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आमदार प्रशांत बंब यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या पत्रात संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य केल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींकडे लक्ष वेधले होते. अनेक ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, निराधार महिला तसेच अशिक्षित लाभार्थ्यांकडे ही कागदपत्रे उपलब्ध नसतात. काही ग्रामपंचायतींमध्ये जन्मनोंदी नसल्यामुळे पात्र व्यक्तींनाही योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले होते.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचा दाखला, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र आदी पर्यायी कागदपत्रांचा विचार करावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना देऊन पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार बंब यांनी केली होती.

**१४ ऑक्टोबरच्या शासन निर्णयामुळे दिलासा**

शासनाने १४ ऑक्टोबर रोजी घेतलेल्या निर्णयानुसार आधार कार्डाला जन्मतारखेच्या पुराव्यासंदर्भात मान्यता देण्याचा मार्ग उपलब्ध झाल्याने आवश्यक कागदपत्रांअभावी अडचणीत सापडलेल्या लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवण्यासाठी होणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होऊ शकते. गरजू लाभार्थ्यांना योजनांचा लाभ सहजपणे मिळावा आणि केवळ आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे कोणताही पात्र नागरिक शासकीय मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी आमदार प्रशांत बंब यांनी केलेला लेखी पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. आता शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळणे आवश्यक आहे.

## निधनवार्ता

### उद्योजक गुलशन कंत्रोड



**अहिल्यानगर :** शहरातील उद्योजक व गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि घर घर लंगर सेवेचे सेवादार गुलशन बिकमदास कंत्रोड यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुली, जावई, नातवंडे, एक बहीण असा परिवार आहे. माजी नगरसेवक राजेंद्र कंत्रोड यांचे ते बंधू होते.

### प्रयागाबाई आर्ले



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील नवीन दहिफळ येथील प्रयागाबाई रावसाहेब आर्ले (वय ७५) त्यांचे उपचारा दरम्यान खाजगी रुग्णालय लोणी येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुलं, चार मुली,जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या माजी सरपंच कुंडलिक आर्ले यांच्या मातोश्री होत्या.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १८० २७० १४४ | ६ | २४० २६८ ३३० | २ | ३४५ ३९० ३३६ |

१९-९५-७६-६५-८२-२०

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२८ १४६ ११९ | ७ | १२४ ४६७ १३३ | ४ | १३० ६८० ७७० |

०१-१२-३७-७६-८४-४५

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २४० २६८ ३३० | ८ | १२५ २६० ४४० | ४ | १३० २४८ २२० |

३६-६०-५८-८९-१४-४२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# पशुधनाच्या सर्व्हेक्षणातून चारा उत्पादनाचा अहील्यानगर पॅटर्न

## मंत्री विखे पाटील यांच्या सूचनेनंतर पशुसंवर्धन विभागाचा आराखडा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** टंचाई परीस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाने तालुकानिहाय सव्हेक्षण सुरू केले असून,जिल्ह्यातील ६४ हजार पशुपालकांकडे जावून पशुधनाची माहीती संकलित केली आहे.मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नाने टंचाईच्या परीस्थीतीत चारा उत्पादनाचा "अहील्यानगर पॅटर्न" तयार होणार असून,चारा उत्पादनाचे नियोजन टंचाईच्या परीस्थीतीत पशुधनासाठी मोठा आधार ठरणार आहे.



जिल्ह्यात पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्येक तालुक्यात जावून टंचाई आढावा बैठका घेतल्या.यामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील चारा टंचाईच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या. पशुसंवर्धन विभागाकडे असलेली पशुधनाची आकडेवारी,चारा उत्पादनाचे नियोजन आणि बियाणे वाटपात ढासळलेले नियोजन याचे गांभिर्य लक्षात घेवून विभागाला तालुका निहाय स्वतंत्र आरखडा तयार करण्याच्या सूचना प्रत्येक बैठकीत दिल्या होत्या.

प्रत्येक तालुक्यात असलेली पशुपालकांची संख्या,पशुधनाची संख्या,चारा उत्पादन करणारे शेतकरी,चारा मिळावा म्हणून मागणी करणारे शेतकरी आणि शासानाच्या योजनेनूसार मोफत बियाणे घेवून चारा उत्पादन करण्यासाठी तयार असलेल्या शेतकऱ्यांची माहीती संकलित करण्यासाठी मंत्री डॉ विखे पाटील यांच्या संकल्पनेतून एक प्रारूप तयार करण्यात आले आहे.पावसाअभावी यावर्षी चारपीक धोक्यात आली आहे. त्यामुळे टंचाईच्या परीस्थीतीत पशुधनावरच शेतकऱ्यांना अवलंबून राहावे लागणार आहे.यासाठी चारा उत्पादनावर प्रशासकीय यंत्रणेने अधिक लक्ष केंद्रीत करावे आशा सूचना पालकमंत्री ना विखे पाटील यांनी वेळोवेळी प्रशासनला दिल्या आहेत.

पशुसंवर्धन विभागातील सर्व वरिष्ठ आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संपूर्ण तालुक्यात याबबातचे सर्व्हेक्षण सुरू केले आहे.अहील्यानगर जिल्हा दूध उत्पादनामध्ये सर्वात मोठा जिल्हा ओळखला जातो.पशुधनाची संख्या मोठी असून त्यादृष्टीने करण्यात येत असलेले चारा उपलब्धतेचे नियोजन टंचाईच्या सर्व परीस्थितीत दिलासा देणारे ठरणार आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुधनाची गणना यापुर्वी करुन टॅगिंग करण्यात आले. जनावारांच्या नोंदी अचूकपणे झाल्या आहेत.नव्या सव्हेक्षणात पुन्हा पडताळणी होत असल्याने पशुधनाची नेमकी आकडेवारी,चारा मागणी आणि पशुधनाच्या दृष्टीने भविष्यातील नियोजन गांभिर्याने होत आहे.

**हायड्रोफोनिक्सचा उपयोग करा**
चारा उत्पादनासाठी हायड्रोफोनिक्सचा उपयोग प्रशासनाने करावा ही आग्रही भूमिका पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. टंचाई आढावा बैठकीत सर्वच ठिकाणी याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला. पशुसंवर्धन विभागाने प्रायोगिक तत्वावर याची सुरूवात करावी आवश्यक सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

द • ख • ल



## ज्ञानदेव सुंबरे यांचा तालुका क्रीडा विभाग व भोयरा गांगर्डा ग्रामस्थांच्यावतीने सन्मान

**टाकळी ढोकेश्वर :** पिंपळगाव रोठा गावचे सुपुत्र व श्री हरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ कर्जुले हर्या या संस्थेतील शिक्षक ज्ञानदेव सुंबरे यांची महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद घेतली आहे.वयाच्या पन्नाशीत उत्कृष्ट शारीरीक क्षमतेसह दररोज दोन तास जिद्दीने पोहण्याचा सराव व पंधरा वर्षांच्या सरावातील सातत्य शिवाय दररोज १०० सूर्य नमस्कार व आठवड्यातून एक दिवस २०ते २५ किमी रनिंग तसेच गेली १५ वर्षांपासून नियमित पोहण्याचा सराव.या जोरावर मांडओहोळ धरणाचे हे १४ किमी अंतर त्यांनी सर्व दिशांना पोहून पाच तासात पूर्ण केले. पारनेर तालुका क्रीडा स्पर्धा या भोयरे गांगर्डा या ठिकाणी आयोजित केल्या होत्या.या कार्यक्रमाचे औचित्य साधून त्यांच्या सन्मान पारनेर तालुका क्रीडा विभाग व भोयरे गांगर्डा ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानदेव खुरांगे,,तुकाराम वाखारे, बापुराव होळकर,सुदामराव दळवी, दादासाहेब रसाळ,सुभाष भोगाडे,भाऊसाहेब भोगाडे, अप्पासाहेब रसाळ,दौलत गांगड,संतोष गांगड, भाऊसाहेब भोगाडे,संतोष केकडे,आदिनाथ गायकवाड,अर्जुन रसाळ,विजय कामठे,रवींद्र भोगाडे बापू भोगाडे,अक्षय भोगाडे,धनेश भोगाडे,हनुमंत रसाळ,महादेव भोगाडे,दत्तात्रय कामठे व क्रिडाप्रेमी उपस्थित होते.

## समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगमध्ये जागतिक मानसिक आरोग्य दिन उत्साहात




**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, बेल्हे येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे तसेच ताणतणावाचे योग्य व्यवस्थापन आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने पोस्टर प्रदर्शन व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य वैशाली आहेर आणि समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या प्राचार्य ऐश्वर्या गटकळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पोस्टर प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील ताणतणाव, भावनिक संतुलन, सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत प्रभावी संदेश सादर केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा वापर करून तयार केलेल्या पोस्टर्सच्या माध्यमातून मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हर्षदा गोफणे, आयेशा जमादार, सानिया शेख, उज्ज्वला साळवे आणि स्नेहल येवले यांनी उत्कृष्ट नियोजन व आयोजन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विविध उपक्रमांमुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## शेवगाव तहसील कार्यालयात महात्मा जोतिबा फुले महसूल लोकअदालत अभियान

**हातगाव :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राज्यात महात्मा फुले महसूल लोकअदालत अभियान हाती घेण्यात आले असून हे अभियान येत्या २७ ऑक्टोबर व १५ डिसेंबर २६ रोजी तहसील कार्यालयात पार पडणार असल्याबाबतची माहिती शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांनी दिली आहे. या अभियानात महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयामध्ये जमिनीशी संबंधित महसुली दाव्यासंदर्भात क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून राज्यातील प्रलंबित प्रकरणे जसे की दरखास्त दावे, रस्ता वहिवाट दावे महाराष्ट्र शासन जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १४३ नुसार आणि मामलेदार कोर्ट क्ट १९०६ चे कलम ५ (२) अन्वये, वारस नोंदीची प्रकरणे, अधिकार, अभिलेषा प्रकरणे, ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम अंतर्गत प्राप्त प्रकरणे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ नुसार वाटप प्रकरणे, इत्यादी आपआपसातील सहमतीने व जलदगतीने निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासन महसूल व विभाग यांचे संदर्भातील शासन निर्णयान्वये दि. १सप्टेंबर २६ ते दि. ३१ मार्च २७ या कालावधीत महात्मा फुले मसूल लोक अदालत अभियान राबवण्याचा राज्य शासनाने महत्वपूर्ण निर्णय घेतला. असल्याचे सांगून दहाडदे म्हणाले की, सदर अभियानामध्ये मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार , तहसीलदार उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व अप्पर जल्हाधिकारी,जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्याचा अपिलांचा समावेश असेल त्याचबरोबर या आपिलाअंतर्गत शेवगाव तालुक्यात दि.२७ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर २६ रोजी सकाळी ११ वाजता शेवगाव तहसील कार्यालय येथे महसूल लोकअदालत आयोजित करण्यात आलेली आहे.



# लोकप्रतिनिधी शुभेच्छा फलकांवर.....

## जनता पाण्यासाठी वाऱ्यावर; टँकर मधील पाणी रस्त्यावर

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** दुष्काळग्रस्त जनतेची क्रूर चेष्टा... तालुक्यात सध्या ६२ गावे ३५१ वाड्या साठी ७४ टँकरच्या माध्यमातून १५७ खेपा होतात. पांढरीपुल, राक्षी व अमरापूर येथे उद्भव असून माणशी पाणीवाटपाचे प्रमाण व प्रत्यक्ष मिळणारे पाणी या मध्ये मोठी तफावत आहे. गेल्या काही दिवसांपासून अधिकाऱ्यांच्या नियमित बैठका होत आहेत लोकप्रतिनिधी साप्ताहिक बैठकीतून आढावा घेतात कागदावर कागद लागतो सूचनांचा भडिमार होतो होकारांची कणगी भरली जाते. प्रत्यक्षात मात्र दुष्काळाची तीव्रता वाढत असताना तालुक्यात टँकर चालू असतानाही त्यांचाही ग्रस्त लोकांची तहान भागत नाही ही वस्तुस्थिती आहे यातून गांभीर्याने मार्ग काढण्या ऐवजी कागदी वाचून बैठका रंगत असतील तर मार्ग कसा निघणार असा प्रश्न त्यांचाही नेतृत्व जनतेला पडला आहे घरात धान्य नाही. शेतात गेल्या दोन वर्षात चाऱ्याची गंज रचली गेली नाही. फळबागा उध्वस्त होत चालल्या चाऱ्यासाठी निव्वळ आता उसाच्या वाढ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. चाऱ्यासाठी उसाची तोड मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याने कारखान्यांनी धावपळ करत पट्टा फिरवायला सुरुवात केली. उसासाठी साखरेपेक्षाही गोड बोलत कारखानदार ऊस उत्पादकांच्या मागे पळत आहेत. कोरोना काळ वगळता नवरात्र काळात भाविकांची मोहटादेवीला कधीही गर्दी कमी झाली नाही.

इतर वर्षांच्या तुलनेत यंदाच्या वर्षी मोहटादेवीला भाविकांची गर्दी कमी आहे. व्यापारी, शेतकरी, मजूर, कष्टकरी असे सर्वच जण त्रस्त आहेत. शासनाचे शुभेच्छा फलकांबाबतचे सत्कार समारंभाचे आदेश भाषणातून सर्वत्र दिले जातात. मात्र सत्कार सोहळ्याचा मोह कोणालाही आवरत नाही. पदर पैसे खर्च करून नवरात्रोत्सवासाठीच्या कमानी दिल्या जात असल्या तरी ज्या जनतेच्या भावनेतून नेतृत्वासाठी व सार्वजनिक जीवनासाठी कौल मिळतो ती



जनता दुःखी, कष्टी असताना शुभेच्छा फलक, वाढदिवसाचे फलक स्वागत कमानींवर नेत्यांनी व त्यांच्या समर्थकांना हसरे फोटो छापण्याचा मोह आवरायला हवा. किती कमानी व फलकांची परवानगी पालिकेकडून घेतली गेली, याबाबत कर्मचारी मौन बाळगतात.

वाहतुकीला अडथळा ठरतील अशा प्रकारची फलक लावले गेले आहेत. अपघात झाल्यावर कारवाई होणार का. विजेच्या खांबावर फलक लावण्यास राज्य शासनाची मनाई असतानाही राजरोसपणे विजेच्या खांबावर फलक लावले जातात. बाहेरगावी स्थायिक झालेल्या भूमिपुत्रांनाही शहरात फलक लावून शुभेच्छा देण्याचा मोह आवरत नाही. त्याकडे अधिकारी डोळेझाक करतात. तहसील कार्यालयातून बैठकीतून गावांमध्ये येताना एखादा तरी फलक अधिकाऱ्यांच्या नजरेस पडला असेल तर त्याविरुद्ध दखल घेण्याची तसदी का घेतली जात नाही, असा खरा प्रश्न आहे. अशा गोष्टींविरुद्ध लोक भावना अतिशय तीव्र आहे. सत्कार समारंभ, वाढदिवसाची सोहळे करू नका, असे सांगणाऱ्या नेत्यांकडून उत्साही कार्यकर्त्यांना सुद्धा आवर घालायला हवा. समाज माध्यमांमधून दुष्काळी दौरे करताना बळीराजापुढे नेत्यांना अश्रूढाळताना पाहिले, त्यातील काही नेत्यांना शुभेच्छा फलकावर हसतानाही पाहिले, त्यामुळे नेमका कोणता फोटो ग्राह्य धरायचा असा प्रश्न भाबड्या जनतेला पडला आहे. यंदाचा दुष्काळ प्रशासनाच्या हाताबाहेर चालला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर जीवनावश्यक वस्तू पुरवण्याबाबत शासनाकडून अद्याप कुठल्याही हालचाली नाहीत. सणासुदीचे दिवस सुरू झाले आहेत. रेशन कार्ड काढायला गेलेल्या माणसाला किती यम यातना होतात, याची कल्पना करवत नाही. पाण्याचा प्रत्येक थेंब सोन्यापेक्षाही महाग आहे याची जाणीव केवळ भाषणातून ठेवून चालणार नाही, तर तशी कृती हवी. तालुक्यात सध्या एकूण ७४ टँकर पैकी किमान १८ ते २० टँकर गळके आहेत. संपूर्ण रस्ते चढउताराचे असल्याने भरलेले टँकर चढ चढताना टँकर मधून प्रेशरने पाणी गळते व सपाट रस्त्यावर धावताना खड्ड्यातून आदळ आपट होताना टँकरचे पाणी संथपणे सतत गळत असते.

## आरटीई प्रवेशाच्या प्रश्नावर खा. लंके यांचे ठिय्या आंदोलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागेत प्रवेश निश्चित झालेल्या जीविका महेश देशमाने या विद्यार्थिनीच्या प्रवेश प्रक्रियेत झालेल्या कथित दिरंगाईच्या निषेधार्थ खासदार नीलेश लंके यांनी गुरुवारी (दि. १५) पारनेर पंचायत समितीच्या शिक्षण विभागात ठिय्या आंदोलन केले. प्रवेशासाठी पाच हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोपही पालकांनी केला. विद्यार्थिनीच्या प्रवेशाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार यांनी दिल्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास आंदोलन मागे घेण्यात आले.



जीविका देशमाने हिचा पारनेर शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आरटीईअंतर्गत प्रवेश निश्चित झाला होता. मात्र, शिक्षण विभागाच्या पडताळणी समितीने संबंधित पत्त्यावर पालक वास्तव्यास नसल्याचा अहवाल दिल्यानंतर तिचा प्रवेश रद्द करून संपूर्ण शुल्क भरण्याच्या सूचना शाळेला देण्यात आल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विद्यार्थिनीचे वडील सुपा औद्योगिक वसाहतीत नोकरी करतात, तर आई शेतमजुरी करते. पडताळणीच्या वेळी पालक कामासाठी बाहेर असल्याने घर बंद होते. त्यानंतर घरमालकाने संबंधित कुटुंब भाड्याने राहत असल्याचा लेखी जबाब शिक्षण विभागात दिला होता. पालकांनी २० ऑगस्ट रोजी यासंदर्भात अर्ज दाखल केला. मात्र, हा अर्ज २२ सप्टेंबर रोजी गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे पोहोचल्याचे सांगण्यात आले. त्यानंतरही प्रवेशाबाबत निर्णय झाला नसल्याने पालकांनी खासदार लंके यांच्याकडे तक्रार केली. लंके यांनी शिक्षण विभागाशी वारंवार संपर्क साधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तरीही कार्यवाही होत नसल्याने त्यांनी गुरुवारी थेट शिक्षण विभागात जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला. दुपारी दोन वाजता सुरू झालेल्या आंदोलनादरम्यान अर्जाच्या कार्यवाहीवरून खासदार लंके आणि गटशिक्षणाधिकारी यांच्यात चर्चा झाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर विद्यार्थिनीच्या प्रवेशाबाबत पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनादरम्यान शिरापूर येथील उचाळे वस्ती शाळेतील दोन्ही शिक्षक २७ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले असून, त्यांच्या जागी अद्याप शिक्षक नियुक्त न झाल्याचा मुद्दाही समोर आला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेतील दिरंगाई आणि शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे यांबाबत शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या आंदोलनात विद्यार्थिनीचे पालक, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे, योगेश मते, राजू शेख, डॉ. सचिन औटी, भूषण शेलार, जितेश सरडे, संदीप शिंदे, भाऊ साठे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## पाटबंधारे विभागाने पाण्याचे नियोजन करण्याची गरज : लामखडे

**रोहन उनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या पाण्याची पारनेर तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांना यावर्षी मोठ्या प्रमाणात गरज भासणार असून राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने सरकारचे पाण्यावर कडक निर्बंध आहेत. यासाठी नारायणगाव येथील पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाण्याचे नियोजन कशाप्रकारे आहे याची माहिती शेतकऱ्यांना देण्याची मागणी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे यांनी अधिकाऱ्यांना निवेदन पाठवून केली आहे. याबाबत लामखडे यांनी म्हटले आहे की राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने सरकारचे पाण्यावर कडक निर्बंध आहेत. मात्र शेतकऱ्यांनी कोनते पिके घ्यायची याचे वेळापत्रक शेतकऱ्यांनी तयार केले आहे. मात्र दुष्काळी परिस्थिती असल्याने कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना शेतकरी प्राधान्य देणार आहे. यासाठी नारायणगाव विभागाचे पाटबंधारे अधिकारी यांनी मात्र यावर्षी पाणी कधी सोडणार आहे व पाण्याचे रोटेशन किती दिवसाचे आहे तसेच कोनत्या तालुक्यासाठी किती दिवस पाणी देणार आहे याचे वेळापत्रक जाहीर करणे गरजेचे आहे. यासाठी सल्लागार मंडळाची बैठक शासनाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी घेणे गरजेचे आहे. कारण पाणीवापर संस्थांना पाण्याची गरज लागल्यानंतर ते सामुहिक रित्या नारायणगाव येथील अधिकाऱ्यांना संपर्क करुण पाण्याची मागणी करतात. पारनेर तालुक्यातील कुकडी लाभधारक शेतकरी विशेष करुन हरभरा, गहू,कांदा ही तीनही पिके प्रामुख्याने घेत असतात. या तीनही पिकांना पाण्याचे तीन रोटेशन मिळणे गरजेचे आहे. यामध्ये पहिले रोटेशन नोव्हेंबर महिन्यात दुसरे रोटेशन डिसेंबर महिन्यात तसेच तीसरे रोटेशन जानेवारी महिन्यात किंवा फेब्रुवारी महिन्यात मिळणे आवश्यक आहे. तसेच पारनेर तालुक्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे यासाठी जनावरांसाठी हिरवा चारा घास मका कडवाळ घेणे गरजेचे आहे यासाठी मार्च किंवा एप्रिल महिन्यात आठ दिवसाचे पाण्याचे रोटेशन पारनेर



तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळण्याची गरज आहे.

आणी जर सरकारच्या कडक निर्बंधाने पाण्याचे तीन रोटेशन न मिळाल्यास शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा आर्थिक भुर्दंड बसणार आहे. पाऊस न झाल्याने सोयाबीन, कापूस,बाजरी ही पिके जळाल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. त्यातच कांदा उत्पादन घ्यायचे असेल तर किमती बियाणे घेऊन रोपं तयार करायची शेतीची मशागत करायची लागवड करायची यासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पाण्याचे तीन रोटेशन न मिळाल्यास शेतकरी अधिक कर्जबाजारी होईल. अगोदरच शेतकरी सोयाबीन कापूस व बाजरी या पिकांना वेळेवर पाऊस न झाल्याने पिके जळाली आहेत. शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यासाठी नारायणगाव विभागाचे पाटबंधारे अधिकारी यांनी पाणी वापर संस्था व शेतकऱ्यांची भुमिका सरकारला सांगणे आवश्यक आहे.

## निमगाव खलु दरोड्यातील एक संशयित ताब्यात

### मोटारसायकल हस्तगत, तपासाला वेग

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलु येथे दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला करून महिलेचा मृत्यू झालेल्या आणि लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याच्या प्रकरणात महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने राजेश अशोक काळे आणि श्रीकृष्ण ऊर्फ लगड्या आकाश काळे (रा. राजनगाव मस्जिद, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले असून ताब्यात घेतलेल्या संशयिताने



स्वतःहून गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती मिळाली असून, चोरीच्या मुद्देमालातील एक मोटारसायकल पोलिसांनी हस्तगत केली आहे.निमगाव खलु येथील या रक्तरंजित घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुरू ठेवला असून, या कारवाईमुळे तपासाला महत्त्वाचा धागा मिळाल्याचे मानले जात आहे. मात्र, या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, चोरीला गेलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम कुठे आहे. याचा तपास अद्याप महत्त्वाचा ठरणार आहे.यातील संशयिताची भूमिका, हस्तगत केलेल्या मोटारसायकलीचा गुन्ह्याशी असलेला संबंध आणि इतर आरोपींचा सहभाग याबाबत पुढील तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

या तपासात एपीआय हरीश भोये, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, योगेश भिंगारदिवे, अरविंद भिंगारदिवे, गणेश धोत्रे, भाऊसाहेब काळे, सतीश भवर, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब गुंजाळ आदी कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.या प्रकरणाचा पुढील तपास श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप करीत आहेत.


## कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा

तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर.

### शेतमाल तारण कर्ज योजने बाबत जाहिर निवेदन

या निवेदनाद्वारे सर्व शेतकऱ्यांना कळविणेत येते की, **महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे** यांचे अटी, शर्ती व सहपत्रास अधिन राहुन कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा मार्फत सन २०२६-२०२७ या हंगामात शेतक-यांच्या तूर, मुग, उडीद, सोयाबिन, सुर्यफुल, हरभरा (चना), ज्वारी, बाजरी, मका, गहु इ. पिकांसाठी बाजार समितीचे गोदाम किंवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या **गोदाम पावतीवर** शेतमालाच्या चालु बाजारभावाच्या रकमेच्या ७५ टक्के पर्यंतची रक्कम शेतक-यांस १८० दिवसांच्या मुदतीसाठी द.सा.द.शे. ६ टक्के व्याजाने शेतमाल तारण कर्ज योजना बाजार समितीकडुन राबविणेत येत आहे. तरी शेतक-यांसाठीच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा जास्तीत जास्त शेतक-यांनी सहभाग घेऊन सदर योजनेचा सर्वाधिक लाभ घेण्यात यावा. शेतमाल तारण कर्ज योजना **दिनांक २०/१०/२०२६ पासुन** सुरु करण्यात येत आहे. या बाबतचे अटी, शर्ती, व सहपत्राचे माहितीसाठी बाजार समिती, श्रीगोंदाचे मुख्य कार्यालय, श्रीगोंदा येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायं. ०५ या वेळेत संपर्क साधावा.

| अ. नं. | कर्मचाऱ्याचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्री. परशुराम गोविंद सोनवणे | ९६०४१३०२९३ |

**राजेंद्र बा. लगड** प्रभारी सचिव | सिल | **मनिषा यो. मगर** उपसभापती | **प्रविण उर्फ अतुल लोखंडे** सभापती

**कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदा तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर.**


## मेहेरबाबांच्या नवजीवन यात्रेला १६ ऑक्टोबरला ७७ वर्षे पूर्ण

**अहिल्यानगर :** अवतार मेहेरबाबांनी १६ ऑक्टोबर १९४९ रोजी नवजीवन यात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी आपली सर्व संपत्ती दुसर्याचा नावावर केली,स्वतासह सोबतच्या २० शिष्यांना हि आपली सर्व चल-अचल संपती काहीही स्वताजवळ ठेवली नाही त्याला या १६ ऑक्टोबरला ७७ वर्षे पूर्ण होत आहे अशी माहिती डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली कलचुरी पुढे म्हणाले श्रमयुक्त जीवन,ध्यानधारणा,भिक्षा मागून खाणे व भटकंती अश्या असाह्य,पूर्ण आशा रहित जीवन, देवाच्या भरवश्यावर जगणे त्यांनी २ वर्ष जगले. शेवटी बनारसला आपल्या जवळील सर्व सामान वाटून टाकले व जीवनाचे चार प्रतिक म्हणून पांढरा घोडा-शांतीचे प्रतिक, कष्टाचे प्रतीक-गाढव,सहन शक्तीचे प्रतीक-उंट व त्यागाचे प्रतिक-गाय हे चार प्राणी आपल्या पदयात्रेत घेतले. बाबानी नवजीवन प्रवासात मेहेरबाबा ईश्वर तत्त्वाची कवचकुंडले बाजूला सारून एखाद्या साधका प्रमाणे साधे निर्हेतुक जीवन जगत होते. आयुष्यात येणाऱ्या सर्व आपत्तींना तोंड देण्याची त्यांची सिद्धता होती.


### जाहीर नोटीस

**विषय :- जन्म/मृत्यु नोंदीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणेबाबत.....**
**संदर्भ :- श्रीम. मिना पांडुरंग पिचड रा. पिंपरकणे ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचेकडील अर्ज दि. २२/०७/२०२६.**

ज्याअर्थी श्रीम. मिना पांडुरंग पिचड रा. पिंपरकणे ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांची मुलगी कु. वैष्णवी पांडुरंग पिचड हिचा जन्म दि. २३/०६/२०२० रोजी वागदरी येथे झाला असून अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय वागदरी यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नसल्याने जन्म नोंद आदेश होणेकामी अर्ज तहसिल कार्यालयात दाखल केला आहे. तरी अर्जदार श्रीम. मिना पांडुरंग पिचड रा. पिंपरकणे ता. अकोले जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असुन अर्जदार यांची मुलगी कु. वैष्णवी पांडुरंग पिचड हिचा जन्म दि. २३/०६/२०२० रोजी वागदरी येथे झाला या बाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय वागदरी येथे होण्याबाबत कोणाची काही हरकत / अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रासध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

शिक्का — सही/- तहसिलदार अकोले

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/हस्ते/२०२६
कोपरगांव दि. १) १२०२६

**कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.**

युनुस बाबुलाल मनियार रा. कोपरगाव, ता. कोपरगाव ----**अर्जदार**

**विरुध्द सामनेवाले**

निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी कोपरगाव न. प. कोपरगाव ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर...... ---**सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार युनुस बाबूलाल मानियार ए. कोपरगाव यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार यांची आई कै. हुसेनबी बाबुलाल मनियार दिनांक. ११/०४/२०२० रोजी मौजे.-कोपरगाव ता. कोपरगांव येथे /मृत्यु झाला आहे. अर्जदारांची आई /मृत्युची नोंद निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी कोपरगाव न.प. कोपरगाव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदारांची आई /मृत्युची नोंद, जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांची आई दिनांक. ११/०४/२०२० रोजी मौजे. कोपरगाव ता. कोपरगांव येथे /मृत्यु झाला आहे. अर्जदार यांची आई /मृत्युची नोंद निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी कोपरगाव न.प. कोपरगाव, ता. कोपरगांव जि.अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मृत्युची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे. आज दि. २९/०१/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

शिक्का — सही/- हुकूमावरुन तहसिलदार कोपरगांव

### जाहीर नोटीस

ॲडव्होकेट श्री, एस.ए.पांडे
निशाणी नं. ६
दिनांक १४/१०/२०२६
नेमलेली ता. २५/११/२०२६

**श्रीरामपुर येथील मे. २ रे सिव्हील जज्ज साहेब (ज्यु डी) यांचे कोर्टात....**

वारस चौकशी अर्ज नं, ७८/२०२६

१. श्रीमती. सुजाता सुरेशचंद्र बांठीया, वय ६८ वर्ष, चंदा गृहिणी., २. श्री. अमोल सुरेशचंद्र बांठीया, वय ४५ वर्ष, धंदा व्यवसाय, ३. श्री. पियुष सुरेशचंद्र बांठीया, वय ४१ वर्ष, धंदा वैदयकीय व्यवसाय, सर्व रा. 'सौभाग्य आनंद' वढणे वस्ती, त्रिंबकनगर, वार्ड नंबर ७, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर ४१३७०९ मो. ९९६०६५५३००
४. सौ. पुनम धिरज पारख, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम, रा. कसारे, ता. साक्री, जि. धुळे मो. ९४२०८६२७६० ---**अर्जदार**

विरुध्द

कोणी नाही. -----**सा.वाला**

अर्ज: भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये
याकामी अर्जदारांचा अर्ज असा की,
१. अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं २ ते ४ यांचे वडील सुरेशचंद्र फुलचंद बांठीया यांचा दिनांक १७/०१/२०२६, रोजी नानावटी हॉस्पिटल, मुंबई येथे मृत्यु झालेला आहे. मयत सुरेशचंद्र फुलचंद बांठीया यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत, मयत सुरेशचंद्र फुलचंद बांठीया यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपुर येथे पी.पी.एफ. खाते कमांक ११३२८६९७०५४ असा असुन त्यामध्ये दिनांक १०/०६/२०२६ अखेर रक्कम रूपये २३,७२,७२८/- अशी रक्कम आहे. बँकेने अर्जदारांना रक्कम काढणेकामी मा. कोर्टा कडुन वारस प्रमाणपत्र आणणेकामी तोंडी कळविल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा वारस चौकशी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदरहु अर्जदार हे मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहीतगार वकिलांकरवी २ रे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, श्रीरामपुर या मे. कोर्टात हजर होवुन योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा पुढील आदेश केले जातील, आज दि१५ माहे ऑक्टोबर सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व में न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- **बेंच क्लार्क, २ रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर** | शिक्का | सही/- **सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर**

### सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा.रु.
पान.नं.

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं.४२२
दि.३०.०७.२०२६

अर्जदार
१. श्री योगेश विठठल काळे रा. कुरुडगांव ता. शेवगांव
सामनेवाला - सरकार

सदर अर्जदार हा मौजे कुरुडगांव येथील रहिवाशी आहे. सदर अर्जदार **श्री. योगेश विठ्ठल काळे यांचा मुलाचा स्वराज योगेश काळे यांचा जन्म दि.१०.०६.२०२० रोजी एकनाथ आयुर्वेद रुग्णालय शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर** असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलाचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलाचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायांचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोद नसलेबाबत दि.०६.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते, अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा मुलाचा जन्म नृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. / /२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यू नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि.३०/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

शिक्का — सही/- हुकमावरुन **तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

# दखल

## सेवा संकल्प अभियानांतर्गत ६८६ आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून आरोग्याचा जागर

**पुणे :** जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांवर सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित ६८६ आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ३८ हजार ५८७ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. या सुविधेचा २ हजार ४४५ गरोदर महिलांनी लाभ घेतला.

या उपक्रमांतर्गत आंबेगाव-१२६, बारामती- ६१, भोर-३४, दौंड- ४९, हवेली- ५७, इंदापूर ४०, जुन्नर ५१, खेड- ४९ मावळ- ७९ मुळशी-२२ पुरंदर- ३४, शिरूर- ७३ तर वेल्हा येथे ११ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

१७ सप्टेंबर पासून राबविण्यात येत असलेल्या अभियानांतर्गत स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, योग व ध्यान सत्र, मोतीबिंदू तपासणी, हायपर टेन्शन तपासणी मधुमेह, कर्करोग तपासणी करण्यात आली असून किशोरवयीन मुलींच्या एचपीव्ही लसीकरण, कुष्ठरोग याबाबत समुपदेशन करण्यात आले. या शिबिरादरम्यान ४ हजार १२६ जोडप्यांना कुटुंब नियोजन बाबत मार्गदर्शन, २६ हजार ८१५ नागरिकांचे हिमोग्लोबिन तपासणी, ११ हजार ७८५ मोतीबिंदू तपासणी, राष्ट्रीय संसर्गजन्य कार्यक्रमांतर्गत ३२ हजार ३६५ नागरिकांची हायपरटेन्शन तपासणी, राष्ट्रीय शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत ४० शस्त्रक्रिया यामध्ये ८ हृदय व इतर ३२ शस्त्रक्रिया, ७३५ लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात आले.

## मतदार यादी निरीक्षकांचा १६ ऑक्टोबर रोजी पुणे जिल्हा दौरा

**पुणे :** दि. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम ंतर्गत मतदार यादी सुधारणांबाबत उपाययोजना सुचविणे व त्यासंदर्भातील अहवाल निवडणूक आयोगाला सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी, दावे निकाली काढण्याचा कालावधी आणि मतदार यादीच्या अंतिम प्रसिद्धीच्या वेळी अशा तीन टप्प्यांत मतदार यादी निरीक्षकांकडून पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार मतदार यादी निरीक्षक शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे जिल्ह्याला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान दुपारी ३.३० वाजता मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. मतदार नोंदणी आणि मतदार यादीसंदर्भातील नागरिकांच्या तक्रारी दाखल करून घेण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या तक्रारी व अडचणी मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, मतदार यादी निरीक्षकांच्या भेटीव्यतिरिक्त इतर कालावधीतही मतदार नोंदणीसंदर्भातील तक्रारी भारत निवडणूक आयोगाच्या छत्र्ठड पोर्टलवर तसेच जिल्हास्तरीय कॉल सेंटरच्या १९५० या दूरध्वनी क्रमांकावर नोंदविता येणार आहेत.

## दुष्काळग्रस्त तालुक्यांतील १२ प्रकारच्या सवलती व उपाययोजनांचा आढावा

**पुणे :** जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या दहा तालुक्यांमध्ये शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या १२ प्रकारच्या सवलती व उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतलेल्या बैठकीत आढावा घेतला.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, कृषिपंपांच्या वीजबिलाबाबत सवलती, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे, रोजगार उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता तसेच पिण्याच्या पाण्याचे नियोजन आदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा यावेळी आढावा घेण्यात आला. संबंधित तालुक्यांतील अधिकाऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या सवलती व उपाययोजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

## आंबी बुद्रुक येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**सोमेश्वरनगर :** सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या आंबी बुद्रुक येथील सोमेश्वर विद्यालयात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यालयातील शिक्षक हेमंत गडकरी यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाचनाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अब्दुल कलाम यांना विद्यार्थ्यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिमेभोवती बसून वाचन केले तसेच नियमित वाचन करण्याचा निश्चय व्यक्त केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक बाळू बालगुडे, सोमनाथ डगळे, महेंद्र कुतवळ, नूतन काळाणे, लीना जराड आणि शुभांगी जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक संतोष जेधे यांनी केले.

# पुणे जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांतील पीक नुकसानीचे ८० टक्के पंचनामे पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

रविवारपर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

पुणे : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पीक नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून, आतापर्यंत सुमारे ८० टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. रविवारपर्यंत पंचनाम्यांचे काम पूर्ण करण्याचे जिल्हा प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. त्यानंतर शासनाकडे मदतीसाठी निधीची मागणी करण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळावी, यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

पीक नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी गेल्या सुमारे १५ दिवसांपासून प्रत्येक तालुक्यात महसूल विभाग, ग्रामीण विकास विभाग आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त पथकांमार्फत काम सुरू आहे. आज सकाळी झालेल्या आढाव्यानुसार, जिल्ह्यातील बहुतांश पंचनामे पूर्ण झाले आहेत. नव्याने दुष्काळ जाहीर झालेल्या आंबेगाव आणि जुन्नर या तालुक्यांमध्येही प्रशासनाने आधीपासूनच पंचनाम्यांचे काम सुरू केले होते. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतही सुमारे ६० ते ७० टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत.

**उपलब्ध पाणीसाठ्याचे दीर्घकालीन नियोजन**

**दुष्काळी परिस्थितीबरोबरच आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जिल्ह्यातील धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजांचा संदर्भ देत, डिसेंबरपासून अल निनोचा प्रभाव अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी वर्षातील मान्सूनला विलंब होण्याची परिस्थिती उद्भवू शकते.**

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध धरणांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करणे आवश्यक आहे. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पावसाची कमतरता राहिली, तरी नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करता यावा, या दृष्टीने पाण्याचे नियोजन करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डुडी म्हणाले.

पाण्याच्या वापरात सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येणार असून, त्यानंतर शेती आणि इतर गरजांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन अपेक्षित आहे. पीक नुकसानीच्या पंचनाम्यांची पूर्तता, शासनाकडे निधीची मागणी आणि उपलब्ध जलसाठ्याचे दीर्घकालीन व्यवस्थापन या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

## शिरूरमध्ये २४ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रम

### शाळांमध्ये व्याख्याने, सामूहिक वाचन; जिजामाता उद्यानात ग्रंथप्रदर्शन

**शिरूर :** माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनानिमित्त शिरूरमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिरूर रिक्रिएशन क्लब अँड लायब्ररी यांच्या वतीने शाळांमध्ये वाचनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी व्याख्याने, सामूहिक वाचन तसेच ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले.

शिरूर रिक्रिएशन क्लब अँड लायब्ररीच्या वतीने शिरूर नगरपरिषद शाळा व अन्य शाळांमध्ये 'मुलांकरीता वाचन पेटी हा उपक्रम राबविण्यात येणार असून विदयार्थ्यांना वाचना साठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे रिक्रिएशन क्लबचे अध्यक्ष रवींद्र धनक यांनी सांगितले. 'वाचल्यामुळे मी कसा घडलो!' या विषयांवर व्याख्यान यावेळी देण्यात आले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांकडून नियमित वाचन करण्या बाबत व वाचन चळवळ वृद्धिंगत करण्या बाबत सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख व्हावी, यासाठी त्यांना ग्रंथालयास भेट देण्याचे आवाहन ही यावेळी करण्यात आली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त जिजामाता उद्यान येथे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन शिरूर रिक्रिएशन क्लब, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातील मराठी विभाग, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शिरूर यांनी आयोजन केले होते.

## नवदुर्गा मंडळाची 'झपाटलेली भुतांची गुहा' पाहण्यासाठी जेजुरीकरांची गर्दी; सोबत गरबा-दांडियाचीही धूम

**मयुर कुदळे । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** येथील दवणेमळा रोड परिसरातील महादेव नगरमध्ये नवदुर्गा नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त साकारण्यात आलेली 'झपाटलेली भुतांची गुहा' हा जिवंत देखावा नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. गुहेची रचना, अंधारमय वातावरण, आकर्षक प्रकाशयोजना, थरारक पार्श्वसंगीत आणि जिवंत कलाकारांच्या सादरीकरणामुळे हा देखावा पाहण्यासाठी जेजुरीसह परिसरातील नागरिक गर्दी करत आहेत. विशेष म्हणजे, हा देखावा सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे.

या देखाव्याचे उद्घाटन जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीपभैय्या बारभाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समाजसेविका मीनलताई बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, नगरसेवक योगेश जगताप, नगरसेविका भक्ती कोरपड, नगरसेवक आबा कुदळे, सुभाष दरेकर, मनोज दरेकर, गणेश भोसले, विजूशेठ झगडे, चंद्रकांत झगडे, मनोज शिंदे, संतोष निंबाळकर, सातभाई साहेब यांच्यासह मंडळाच्या अध्यक्षा अमृता अशोक भोसले, उपाध्यक्षा शितल मदने, नसरीन शेख, सचिव वर्षा सूर्यवंशी, खजिनदार पुष्पा हिंगणे, ॲड. सोनाली यादव, मंडळाच्या महिला सदस्य आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

मंडळाचे हे पहिलेच वर्ष असून, पहिल्या वर्षापासूनच नवरात्रोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'भुतांची गुहा' या देखाव्यात तरुण कार्यकर्ते विविध भयावह आणि रहस्यमय पात्रांच्या भूमिका साकारत आहेत. अचानक समोर येणाऱ्या कलाकारांमुळे प्रेक्षकांना थरारक अनुभव मिळत आहे. या देखाव्याचे अनेक तरुण-तरुणी व्हिडिओ आणि रील्स तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करत आहेत.



नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेनिमित्त देवीच्या आगमनावेळी महिला लेझीम पथकाने सादर केलेल्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मंडळातील महिला सदस्यांनी सादर केलेल्या लेझीममुळे उत्सवाच्या वातावरणात आनंदाची भर पडली. मंडळाच्या वतीने दररोज अन्नदानाचा उपक्रम ही राबविण्यात येत आहे.

याशिवाय, मोफत कायदेशीर मार्गदर्शन शिबिरासाठी सासवड बार असोसिएशनच्या अध्यक्ष ॲड. भारतीताई शिंदे आणि ॲड. अशोक भोसले यांच्यासह अन्य सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. महिला आरोग्य तपासणी शिबिरासाठी डॉ. प्रियांका दरेकर, डॉ. रजनी दरेकर आणि डॉ. प्रशांत दरेकर यांनी विशेष सहकार्य केले.नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित गरबा आणि दांडिया कार्यक्रमांमध्येही नागरिक उत्साहाने सहभागी होत आहेत. धार्मिक कार्यक्रमांसोबत मनोरंजनात्मक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याने दवणेमळा रोड परिसरातील महादेव नगरमध्ये नवरात्रोत्सवाची रंगत वाढली आहे. 'झपाटलेली भुतांची गुहा' हा जिवंत देखावा, महिला लेझीम पथक, अन्नदान, मोफत कायदेशीर मार्गदर्शन, महिला आरोग्य तपासणी शिबिर आणि गरबा-दांडिया यांसारख्या विविध उपक्रमांमुळे नवदुर्गा नवरात्र उत्सव मंडळाचा नवरात्रोत्सव चर्चेचा विषय ठरत आहे.

## कुस्ती स्पर्धेत पुणे जिल्ह्याच्या मुलींचे वर्चस्व!

### पुणे जिल्ह्याला सर्वसाधारण विजेतेपद; अहिल्यानगर जिल्हा उपविजेता

**विनोद गोलांडे । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील मु. सा. काकडे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत पुणे शहर, पुणे जिल्हा, अहिल्यानगर आणि नाशिक या चार विभागांतील एकूण ६३ मुलींनी दहा वजन गटांमध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धेत पुणे जिल्ह्याने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले, तर अहिल्यानगर जिल्ह्याला उपविजेतेपद मिळाले.

महाविद्यालयातर्फे प्रत्येक वजन गटातील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक आणि रौप्यपदक देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्वसाधारण विजेत्या व उपविजेत्या संघांना विशेष ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या हस्ते झाले. डॉ. वायदंडे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी महिला कुस्तीपटूंचे कौतुक करताना सांगितले की, एक काळ असा होता की कुस्ती हा खेळ केवळ पुरुषांची मक्तेदारी मानला जायचा; मात्र आज मुलींना कुस्तीच्या आखाड्यात आत्मविश्वासाने लढताना पाहून छाती अभिमानाने फुलून येते. भारतीय महिला कुस्तीपटूंनी ऑलिंपिक आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये देशाचा तिरंगा उंचावला आहे. ते पुढे म्हणाले, मु. सा. काकडे महाविद्यालयाच्या मॅटवर लढणाऱ्या या रणरागिणींमधून उद्याची साक्षी मलिक, विनेश फोगाट आणि अंतिम पंघाल यांच्यासारख्या यशस्वी कुस्तीपटू घडतील, असा मला विश्वास आहे. कुस्तीतील



संघर्ष तुम्हाला आयुष्यातील प्रत्येक संकटाशी लढण्याची ताकद देईल. या स्पर्धेतून निवडला जाणारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संघ राष्ट्रीय स्तरावर सहभागी होणार आहे. राष्ट्रीय स्पर्धेत जास्तीत जास्त पदके मिळवून विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करा, अशा शुभेच्छा देत त्यांनी खेळाडूंना उत्कृष्ट खेळ आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन करण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यापीठाचे अधिकारी किशोर गडियार, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जगन्नाथ साळवे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. राहुल गोलांदे, श्री. दत्ता उतेकर, डॉ. सुहास भैरट, सहसचिव डॉ. शीतल शेंडकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या डॉ. मनीषा पुंडे, अहिल्यानगर विभागाचे सचिव डॉ. राजेंद्र देवकाते आणि डॉ. संतोष भुजबळ उपस्थित होते.

या स्पर्धा आंतरराष्ट्रीय पंच मारुती सातव व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणतीही तक्रार उद्भवू न देता पारदर्शकपणे आणि यशस्वीरीत्या पार पाडल्या. संस्थेचे अध्यक्ष मा. सतीशराव काकडे-देशमुख यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयीन नियोजन व विकास समितीचे अध्यक्ष तथा सोमेश्वर कारखान्याचे संचालक श्री. अभिजीत काकडे-देशमुख यांनी खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांना स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

# अल-निनोच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात पाणीपुरवठ्याचे नियोजन

### स्थानिक स्वराज्य संस्थांना २० टक्के कपातीच्या सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** अल-निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन करून ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीला पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम, पुणे जिल्हा परिषद मुख्य अधिकारी गजानन पाटील . जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अमोल कोल्हे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके , मुख्य अभियंता पुणे मनपा श्री जगताप, श्री तारू यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा वापर प्राधान्यक्रमाने करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. शासन निर्णय दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ अन्वये उपलब्ध जलसाठ्याचा विविध उपयोगांसाठी काळजीपूर्वक आणि काटकसरीने वापर करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने पाण्याचे सूक्ष्म नियोजन केले आहे.

खडकवासला प्रकल्पात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी मृतसाठा, बाष्पीभवन आणि बफर साठा वगळता अंदाजे २० टीएमसी पाणी उपलब्ध असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. हा साठा दरवर्षीच्या तुलनेत अंदाजे २५ टक्क्यांनी कमी असल्याने उपलब्ध पाणी पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पुरविताना काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. परतीचा पाऊस न झाल्याने पाण्याच्या वापरावर मर्यादा येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील पाणीपुरवठ्यात २५ टक्के कपात करण्याची आवश्यकता असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. तसेच शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची मागणी अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके यांनी मांडली.

**स्थानिक स्वराज्य संस्थांना २० टक्के पाणी कपातीच्या सूचना**

पवना, भामा आसखेड, चासकमान आणि नीरा प्रणालीतील प्रकल्पांमध्ये ९० ते ९५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असला, तरी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी २० टक्के पाणी कपात करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

उपलब्ध पाण्याचा विचार करून रब्बी हंगामासाठी सिंचन आवर्तन देण्यात येणार आहे. मात्र, सर्व प्रकल्पांमधील पाण्याचे नियोजन केल्यानंतर उन्हाळी हंगामातील सिंचनासाठी पुरेसा साठा शिल्लक राहण्याची शक्यता नसल्याने उन्हाळी सिंचन आवर्तन देणे शक्य होणार नसल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

**अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी संयुक्त पथके**

अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखण्यासाठी महसूल, महावितरण, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त भरारी पथकांची स्थापना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणारे पंप व मोटारी जप्त करण्याबरोबरच पाणीचोरी आढळल्यास महावितरण विभागाने संबंधितांचे वीजजोडणी खंडित करण्यासाठी कठोर कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

आवश्यक ठिकाणी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यासह कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने परिस्थितीनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**नितीन यादव । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखेच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिन व वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून दहावीच्या बोर्ड परीक्षेत मराठी विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा पुस्तक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सुभाष तळेकर यांनी मराठी भाषेचे महत्त्व आणि वाचन संस्कृतीचे जतन या विषयावर मार्गदर्शन केले. दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९३ हजार विद्यार्थी नापास झाल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन भागणार नाही, तर मराठी विषय शिकविणारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. मातृभाषेतून शिक्षण देणे महत्त्वाचे असून, मराठी ही जीवनविकासाची भाषा आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी केले. आपल्या मनोगतात त्यांनी वाचन संस्कृती वाढावी, या उद्देशाने आतापर्यंत ५५० पुस्तके विद्यार्थ्यांना वाटप केल्याचे सांगितले. महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, गेली अकरा वर्षे वाचनाचे महत्त्व वाढावे यासाठी सातत्याने असे उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी नेहा कामठे, तन्वी कटके, जीवन पवार आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, ओंकार संजय जगताप यांची सहाय्यक महसूल अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्यावरील टर्निंग पॉइंट्स हे पुस्तक व प्रमाणपत्रे, तसेच मराठी विषयातील करिअरच्या संधींची माहिती देणारा तक्ता देण्यात आला.शिक्षकांच्या वतीने मुख्याध्यापक रामदास जगताप यांनी अभ्यासक्रमातील सद्यस्थितीविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. दिलीप निरगुडे होते. याप्रसंगी महेंद्र भोसले, अरुण यादव, रामदास वाघ, राजाराम पिसाळ, संजय जगताप, कोकाटे सर, कामठे सर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. तसेच संतोष काकडे, बाळासाहेब मुळीक, संदीप टिळेकर, शांताराम कोलते, विठ्ठल मुळीक, अक्षय पवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

# ऐन दुष्काळात पाण्याचा अपव्यय

## फुटलेल्या पाइपलाइनमुळे लाखो लिटर पाणी वाया ; अधिकारी आणि ठेकेदारांवर फौजदारी कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** वरवंड तलाव ते कुरकुंभ एमआयडीसी दरम्यान १७०० कोटी रुपये खर्चून टाकलेली लोखंडी जलवाहिनी वारंवार फुटत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. एकीकडे तीव्र उन्हाळा आणि दुष्काळाच्या झळांमुळे नागरिक पाण्यासाठी दाहीदिशा भटकत असताना, दुसरीकडे प्रशासनाच्या आणि ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे लाखो लिटर पिण्याचे पाणी रस्त्यावरून वाहून गेल्याची संतापजनक घटना समोर आली आहे.

बुधवारी रात्री कुरकुंभ एमआयडीसीची मुख्य जलवाहिनी पाटस येथे अचानक फुटल्याने पाण्याचा प्रचंड कारंजा उडाला होता. यामुळे पुणे सोलापूर रोडवरील सर्व्हिस रोड व परिसराला जलमय स्वरूप आले होते, तर दुसरीकडे हजारो कुटुंबे पाण्यासाठी वंचित राहिली आहेत.

**गुणवत्ता तपासावी**

**अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ठेकेदाराने पाइपलाइनचे काम केले आहे. त्याची गुणवत्ता तपासावी व त्यांनी काम कसे केले हेही तपासावे**

**– संजय शिंदे, जय शिवसंग्राम पुणे जिल्हा उपाध्यक्ष, दौंड तालुका अध्यक्ष.**

सारखी सारखी पाइपलाइन फुटतेच कशी?



नागरिकांचा संतप्त सवाल---

याच मार्गावरील पाइपलाइन फुटण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या काही महिन्यांत वारंवार पाइपलाइन फुटण्याच्या घटना घडल्या आहेत. प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून ही वाहिनी टाकली, मग ती वारंवार फुटतेच कशी? यामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले आहे का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. दुरुस्तीच्या नावाखाली फक्त मलमपट्टी केली जाते आणि काही दिवसांतच पुन्हा तीच परिस्थिती उद्भवते, असा आरोपही होत आहे.

**अधिकारी आणि ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी**

एकीकडे ग्रामीण भागात पाण्याचा थेंब थेंब वाचवण्यासाठी टँकरची वाट पाहावी लागत आहे. अशा गंभीर परिस्थितीत लाखो लिटर पाणी वाया घालवणे हा गोरगरीब जनतेच्या हक्कावर गदा आणणारा प्रकार आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून, निकृष्ट दर्जाचे काम करणारे ठेकेदार आणि त्यांच्यावर वरदहस्त असणारे संबंधित जबाबदार अधिकारी यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे (उऑळाळपरश्र उरीश) दाखल करण्यात यावे, अशी आक्रमक मागणी आता स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांनी केली आहे.

**घोषणा आणि इशारा**

पुढील सात दिवसांत पाइपलाइनची कायम स्वरूपी दुरुस्ती झाली नाही आणि दोषींवर कारवाईचे पाऊल उचलले गेले नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी आणि नागरिकांनी दिला आहे.

या घटनेमुळे जलप्राधिकरणाच्या कारभाराचे धिंडवडे निघाले असून, आता वरिष्ठ प्रशासन यावर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## द • ख • ल



## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचा त्याग हा फक्त भारतीयांसाठी : प्रा. दसपुते

**शेवगाव :** डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवन म्हणजे वैराग्याचे, त्यागाचे व सन्याशाचे होय. त्यांनी त्यांच्या जीवनाचा त्याग फक्त भारतवासीयांसाठी केला.आजच्या तरुणांचे विचार थांबलेत त्यामुळे त्यांच्यातील मानसिक विकलांगता वाढत चालली आहे असे प्रतिपादन प्राचार्य संपत दसपुते यांनी केले. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन उत्साहात संपन्न झाला. प्रसंगी अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, प्रा.किरण गोरे, प्रा.दादासाहेब ज्योतिक, अशोक आघवणे,वत्सला जाधव, ज्ञानेश्वर आवारे, विद्यावर्धिनी मुळे, संजय मरकड आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य दसपुते पुढे म्हणाले की, डॉ. अब्दुल कलाम यांची युवकाप्रती महान निष्ठा होती.त्यांनी वेळेला महत्त्व दिले. त्यांच्या जीवनात असंख्य अडचणी आल्या पण त्यांनी हार मानली नाही. विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिन एक दिवस साजरा न करता रोज अर्धा तास ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. जिद्द व चिकाटी हे महत्त्वाचे गुणधर्म त्यांच्याकडे होते. शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा . किरण गोरे आपल्या मनोगतात म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांना वाचनाचे वेड हवे. वाचनाची गोडी निर्माण व्हावी. वाचनाने ज्ञानाची प्रगल्भता वाढते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सर्जेराव निकाळजे, अनुमोदन गजानन दरंदले यांनी दिले तर आभार प्रा.दादासाहेब ज्योतिक यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## निमगाव वाघात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



**अहिल्यानगर :** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती निमगाव वाघा येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. निमगाव वाघा ग्रामपंचायत, स्व. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण केले. या कार्यक्रमाला नाना डोंगरे, प्रवीण पानसंबळ, रामा पवार, सोमनाथ आतकर, रितेश डोंगरे, संदीप डोंगरे, शशिकांत होळकर आदी उपस्थित होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा प्रसार करणे, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि युवकांना राष्ट्रउभारणीच्या कार्यासाठी प्रेरित करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली.

## आबासाहेब काकडे शिक्षण शास्त्र महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**ढोरजळगांव :** नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रा अनिता भालसिंग यांनी केले. त्यांच्या प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचा उद्देश व वाचनातून घडते भविष्य ही कविता या दिनानिमित्त त्यांनी सादर केली.त्यानंतर अध्यक्षीय सूचना खेडकर कावेरी यांनी मांडली, तर अनुमोदन ठोकळ प्रीती यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. पुरोहित अमिता, प्रीती ठोकळ, आठवाल काजल, खेडकर कावेरी यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी चैताली राजपुरे, शिवानी औटी, आठवाल काजल, वंदना काशिद , अर्चना शिरसाठ यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. आशिष गोंदाणे यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व, तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील वाचनाचे योगदान यावर मार्गदर्शन केले. भावी शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांच्यामध्ये ज्ञानार्जनाची प्रेरणा जागृत करावी, वाचन कौशल्य जोपासून ज्ञानसमृद्ध आणि आदर्श शिक्षक बनण्याचा संकल्प करावा,असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार आठरे आकांक्षा यांनी केले, तर सूत्रसंचालन कासुळे आदेश यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. राजेंद्र बांगर, प्रा. राम नेव्हल,प्रा. स्मिता नाईक, प्रा. काळे राजेंद्र तसेच कार्यालयीन कर्मचारी सुमित पंचारिया व राम गाडेकर यांच्यासह प्रथम वर्षाचे व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्येष्ठांच्या आयुष्यात पुन्हा उजळला प्रकाश!



**अहिल्यानगर :** आर्थिक परिस्थितीमुळे डोळ्यांवरील उपचार घेणे शक्य नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे. जागतिक अंध दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून तब्बल ३८ ज्येष्ठ नागरिकांवर पुणे येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मोतीबिंदूमुळे दृष्टी अंधुक झालेल्या या ज्येष्ठांना शस्त्रक्रियेनंतर पुन्हा स्पष्ट दिसण्याची आशा मिळाली आहे. बुधवारी शस्त्रक्रिया पूर्ण करून अहिल्यानगरमध्ये परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर स्वागत केले.

# दुष्काळात कर्ज वसुलीचा तगादा नको

## सक्तीच्या वसुलीविरोधात आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व कामगारांकडून कर्जाचे हप्ते वसूल करण्यासाठी सक्ती करू नये, अशी मागणी युवासेनेने केली आहे. बँका, सूक्ष्म वित्त संस्था, पतसंस्था आणि खासगी सावकारांकडून वसुलीसाठी तगादा लावला जात असल्याच्या तक्रारींची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी युवासेनेचे तालुकाप्रमुख इंजि. निलेश उत्तमराव गोरे यांनी केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कर्जवसुलीबाबत निर्देश दिल्याचा दावा युवासेनेने केला आहे. मात्र, काही ठिकाणी कर्जदारांच्या घरी जाऊन हप्त्यांच्या वसुलीसाठी दबाव आणला जात असल्याने शेतकरी व कामगारांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी युवासेनेच्या वतीने श्रीगोंदा तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. शासनाच्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करून कर्जवसुलीसाठी होणारी कथित सक्ती थांबवावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रशासनाने तातडीने योग्य कारवाई न केल्यास शेतकरी व कामगारांच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही युवासेनेने दिला.

यावेळी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख हेमंत लोखंडे, तालुका संघटक प्रतीक बोरकर, उपतालुकाप्रमुख शुभम गायकवाड, मांडवगण गटप्रमुख गणेश शिंदे, अविनाश घोडके, कुणाल शिरवाळे, किरण बनसुडे, मंगेश साळुंके, अक्षय मखरे, ऋषी रासकर, सिद्धांत घोडके, युवराज साबळे, पंकज बनसुडे, वैभव गायकवाड, शिवानी साळुंके, संदीप बनसुडे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ.कलमांचे जीवन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी : बाळासाहेब निवडुंगे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर :** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे संपूर्ण जीवन रामेश्वरम ते राष्ट्रपती भवन हे अतिशय संघर्षमय होते.सामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ.कलाम आपल्या मेहनतीच्या,जिद्दीच्या आणि ज्ञानाच्या बळावर राष्ट्रपती भवनापर्यंत पोहचले म्हणून त्यांचे जीवन शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. ढोकेश्वर विद्यालयात डॉ.कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन,हात धुणे दिन व जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून निवडुंगे बोलत होते.यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बाबासाहेब जाधव, संदीप महांडुळे, नारायण शेळके, निलेश पाचर्णे,श्रीरंग धामणे, सुरेखा ठाणगे, कल्पना जाधव, सोनल रोहकले, सुमन वाळुंज, स्वप्निल कदम, श्वेता शिर्के, विष्णू भद्रे, रुपाली घोडके, संदीप खिलारी, रामदास नरवडे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजना विश्वासराव यांनी केले सूत्रसंचालन प्रिया डव्हणे यांनी केले तर आभार दिनेश वायदंडे यांनी मानले.

## वाचन संस्कृतीला बळ देण्यासाठी ग्रंथवाचन स्पर्धा ही काळाची गरज : मंगेश जाधव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**सुपा :** सध्याच्या मोबाईल व इंटरनेटच्या युगात युवा पिढी वाचनापासून दुरावली असून व्हॉटसअप वरील शॉर्टकट भाषेमुळे प्रमाण भाषेलाही विसरु लागले आहेत . वाचनापेक्षा सोशल मिडीयाचे नव्या पिढीला आकर्षण आहे. एआयच्या अधिक उपयोगामुळे युवापिढीची नवनिर्मिती आणि कल्पनाशक्ती खुंटली आहे. अशा परिस्थितीत वाचन संस्कृतीला बळ देण्यासाठी ग्रंथवाचन स्पर्धाही काळाची गरज असल्याचे मत न्यू इंग्लिश स्कूल सुपा शाळेचे प्राचार्य मंगेश जाधव यांनी व्यक्त केले, ते पारनेर तालुक्यातील आपधूप येथील श्रीमंगलमुर्ती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणादिन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षपदावरुन बोलत होते. वाचनप्रेरणा दिनाच्या पार्श्वभूमीवर वाचनालयाने प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात बालवाचकांची ग्रंथवाचन स्पर्धा घेतली. प्राथमिक गटासाठी डॉ भाऊ दांदडे लिखित 'छत्रपती संभाजी राजे ' हे पुस्तक तर माध्यमिक गटासाठी कॉ. गोविंद पानसरे लिखित ' शिवाजी कोण होता?' हे पुस्तक वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. पुस्तक वाचनानंतर पुस्तकावर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाची परीक्षा घेण्यात आली त्यातील प्राथमिक गटात शिवानी प्रज्वल गवळी (प्रथम), आराध्या अनिल गायकवाड ( द्वितीय), शिवम संतोष गवळी (तृतीय), शिवान्या गणेश खोसे (चतुर्थ) तर माध्यमिक गटात श्रेया प्रकाश गवळी (प्रथम), साक्षी तुकाराम गोरे ( द्वितीय), ईश्वरी जिजाबापू गवळी (तृतीय), धनश्री प्रकाश गवळी (चतुर्थ) या विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी लेखक व कवी संभाजी नवले आणि वसंत सुरवसे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

## आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय, शेवगाव येथे भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक रवींद्र आगळे, कोटा एक्सलन्स सेंटरचे संचालक प्रा. शिवाजी पोटभरे, ज्येष्ठ शिक्षिका मंजुश्री बुधवंत, प्रा. कालिंदी राजळे , प्रा. ज्ञानेश्वर लबडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कु. श्रुती घुगे, कु. साक्षी टाकळकर आणि कु. प्रीती तूपविहिरे यांनी वाचनाचे महत्त्व विशद करणारे आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने कनिष्ठ महाविद्यालयात वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. सविता फाटके यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी वाचन प्रेरणा दिनाचा उद्देश आणि वाचनाचे विविध फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. समाजातील अनेक थोर व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्व विकासात वाचनाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पुस्तकांचे नियमित वाचन करून आपले ज्ञान समृद्ध करावे, महाविद्यालयातील ग्रंथालयाचा लाभ घ्यावा आणि पुस्तकांशी मैत्री करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य अशोक तमनर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवला. परिस्थिती आणि आर्थिक अडचणी या यशाच्या मार्गातील अडथळे ठरू शकत नाहीत, हे डॉ. कलाम यांच्या जीवनप्रवासातून दिसून येते, असे त्यांनी सांगितले. भारताने जागतिक आर्थिक महासत्ता बनावे, हे डॉ. कलाम यांचे स्वप्न होते. त्या दिशेने आज भारताची वाटचाल सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कालिंदी राजळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिल जगताप यांनी केले, तर प्रा. ज्ञानेश्वर लबडे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## लाडजळगाव संस्थेच्या चेअरमनपदी शेख तर व्हाइस चेअरमनपदी साळवे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यांतील लाडजळगाव येथील विविध कार्यकारी सोसायटी च्या चेअरमनपदी इस्माईल बन्सी शेख व व्हाईस चेअरमनपदी विजय भाऊराव साळवे यांची निवड झाली आहे.संस्थेचे विद्यमान चेअरमन विठ्ठल पंढरीनाथ ढाकणे व व्हाइस चेअरमन आबासाहेब गंगाधर वैद्य या दोघांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी निवड प्रक्रिया पार पार पडली असून चेअरमन पदासाठी इस्माईल शेख व व्हाइस चेअरमन पदासाठी विजय साळवे या दोघांचेच अर्ज दाखल झाले होते. सदरची प्रक्रिया ही सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शेवगाव येथे पार पडली असून यावेळी संस्थेच्या सर्व संचालकासह सरपंच अंबादास ढाकणे, पोलीस पाटील ,आबासाहेब वैद्य, राम पाटील, भगवान पाटील, अर्जुन ढाकणे, विठ्ठल ढाकणे, केदार पाटील, महादेव पाटील, गिन्यानदेव तहकीक, श्रावण पादर या प्रमुख ग्रामस्थांसह इतरही ग्रामस्थ उपस्थित होते.

## वाचनातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिगत विकास साध्य करावा : गव्हाळ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ज्ञानाची आणि वाचनाची आवड लक्षात घेऊन हा दिवस वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि समाजात वाचन संस्कृती वाढवण्यासाठी समर्पित केला गेला आहे. आजच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाच्या व्यतिरिक्त आवांतर वाचन होणे आवश्यक आहे. आवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात, त्यांची आकलन शक्ती वाढते तसेच इतरांवर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठीही आवांतर वाचनाचा उपयोग होतो. वाचनातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिगत विकास साध्य करावा, असे प्रतिपादन विद्यालयातील शिक्षक बाळासाहेव गव्हाळ यांनी केले.

याप्रसंगी विद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विद्यालयाच्या मैदानावर वाचन प्रेरणा दिन ही अक्षरे विद्यार्थी मैदानावर बसून साकारण्यात आली होती. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गोष्टींच्या पुस्तकांचे वाचन केले या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, पर्यवेक्षक महेश शिंदे तसेच सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मोबाईल बाजूला, पुस्तकांशी मैत्री!

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सलग चार तास वाचन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** आजच्या डिजिटल युगात मोबाईलच्या पडद्यावर रमणाऱ्या तरुणाईला पुस्तकांच्या समृद्ध विश्वाची ओळख करून देत वाचन संस्कृतीला नवी उभारी देण्याचा प्रेरणादायी उपक्रम पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राबविण्यात आला. भारतरत्न, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील ४९ विद्यार्थ्यांनी सलग चार तास पुस्तक वाचनात सहभाग नोंदविला. केवळ एका दिवसापुरते वाचन न करता विद्यार्थ्यांच्या जीवनात वाचनाची सवय रुजावी, विचारांना दिशा मिळावी आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात, या उद्देशाने आयोजित केलेला हा उपक्रम विशेष ठरला.

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दूरदर्शन, इंटरनेट आणि यूट्यूब, फेसबुक, व्हॉट्सप, इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे तरुणाईच्या दैनंदिन जीवनात पुस्तक वाचनासाठीचा वेळ कमी होत असल्याचे चित्र दिसून येते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून पुस्तकांच्या सहवासात काही तास घालवावेत, वाचनाचा आनंद अनुभवावा आणि ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा जागृत व्हावी, हा उपक्रमामागील महत्त्वपूर्ण विचार होता. सलग चार तासांच्या वाचन सत्रात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळत वाचनावर लक्ष केंद्रित केले. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण करून



त्यातील आशय, विचार आणि अनुभव शब्दबद्ध केले. उत्कृष्ट पुस्तक परीक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे 'माझे जीवन' हे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी वाचनाचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, वाचन ही श्वासोच्छ्वासाइतकीच जीवनासाठी आवश्यक बाब आहे. केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे किंवा परीक्षेत यश मिळविणे म्हणजे ज्ञानाची परिपूर्णता नव्हे. वाचनातून मिळणारा आनंद, विचारांची प्रगल्भता आणि अनुभवांची समृद्धी माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला व्यापक बनविते. वाचन हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून आयुष्यभर सोबत राहणारी अमूल्य शिदोरी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच दर्जेदार पुस्तकांचे नियमित वाचन केले पाहिजे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देताना त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षणाच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर उंच भरारी घेता येते, याचे डॉ. कलाम हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे नमूद केले. देशाच्या संरक्षण आणि अवकाश संशोधन क्षेत्रातील त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. ज्ञान, जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि वाचनाच्या माध्यमातून स्वतःला घडविण्याचा आदर्श त्यांनी देशासमोर ठेवला. विद्यार्थ्यांनीही पुस्तकांशी मैत्री करावी, ज्ञानाची भूक कायम ठेवावी आणि वाचनाची आवड आयुष्यभर जोपासावी. वाचन संस्कृती रुजविणे हीच डॉ. कलाम यांना खरी आदरांजली ठरेल, असे आवाहन त्यांनी केले.

या वाचन प्रेरणा दिन उपक्रमाचे आयोजन ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, प्रा. सचिन पालवे आणि प्रा. मन्सूर शेख यांनी केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१६ ऑक्टोबर २०२६ । पान ८

## कामगार वसाहत वाहन पेटवण्याचा प्रयत्न ; फिर्याद दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील कामगार वसाहतीत एकास पैशांची मागणी करत धमकी देऊन चारचाकी वाहन जाळण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार समोर आली आहे. किशोर शिवराम शेळके (वय ५०, रा. कामगार वसाहत, राहुरी फॅक्टरी) यांनी यासंदर्भात राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी आरोपी रोहित बाबासाहेब खंडागळे याने पैशांची मागणी करून पैसे न दिल्यास चारचाकी वाहन जाळून टाकण्याची धमकी दिली आहे. त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी रात्री १ ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीच्या घरासमोर उभ्या असलेल्या चारचाकी एरटीगा गाडीवर पेट्रोल टाकून ती जाळण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. या घटनेचा राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण बागुल हे करत आहे.

## हिंदू तरुणी बरोबर मुस्लिम तरुण गरबा खेळतानाचा फोटो प्रसिद्ध केल्याने वृत्तपत्राची होळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : सध्या देशभर शारदीय नवरात्र उत्सव साजरा केला जात आहे. शारदीय नवरात्र हा हिंदूंचा एक पवित्र सण आहे ज्यामधील 'गरबा' हे हिंदू महिला तरुण-तरुणी आणि हिंदू बांधवांनी शक्तीरुप देवीवरील पवित्र भक्ती-भावासाठी एकत्र येऊन साजरा केला जात आहे. त्या माध्यमातून देवीची भक्ती तसेच उपासना करण्याचे एक धार्मिक परंपरा जपली जात आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून सगळीकडे हिंदू जनमानसामध्ये जागरूकता निर्माण झालेली आहे.

अनेक ठिकाणी गरबा म्हणजे दांडिया खेळला जात आहे अशा गरबा खेळण्याच्या ठिकाणी पुरुषांचे आधार कार्ड तपासले जावे अशी मागणी समाजातून करण्यात येत आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे; कित्येक ठिकाणी असे निदर्शनास आले आहे की या गरबा खेळण्याच्या ठिकाणातून लव जिहादाचे षडयंत्र करून हिंदू तरुणींना या षडयंत्राचे भक्ष्य बनवले जात आहे.



अशा हिंदू समाजाच्या सतर्कतेच्या वातावरणात देखील सकाळ सारख्या वृत्तपत्राने हेतूपूर्वक तथाकथित सेक्युलरिझम म्हणजेच सर्वधर्मसमभाव दाखवण्याच्या उद्देशाने १४ ऑक्टोबर रोजीच्या पिंपरी-चिंचवड आवृत्तीमध्ये हिंदू तरुणींच्या सोबत मुस्लिम तरुण गरबा खेळत आहेत असे दर्शविलेले असून हा प्रकार हिंदुत्वाच्या दृष्टीने अत्यंत संताप जनक आणि चिंताजनक आहे.

संपूर्ण देशात तसेच जगभर सगळीकडे लव जिहाद षडयंत्र पसरलेले असताना एक जबाबदार वृत्तपत्र म्हणून सकाळ दैनिकाची ही भूमिका खूपच संशयात्मक आणि खोटा सर्वधर्मसमभाव दाखवण्याच्या उद्देशाने केलेली आहे. तरीसुद्धा या घटनेचा सखोल तपास व्हावा आणि बातमी तयार करणारे एडिटर तसेच वर्तमानपत्राचे मुख्य संपादक या सर्वांवर कडक कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी समस्त हिंदू भगिनीं व सकल हिंदू समाजातून करण्यात आली आहे.

## संभाजी देवकर यांच्या वस्तीवर घरफोडी तीन लाखाचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : कोल्हार - राजुरी रोडवरील तीन चारी परिसरात राहणारे संजय माधव जाधव व कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टचे विश्वस्त संभाजी देवकर यांच्या वस्तीवरील अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दोन्ही ठिकाणचा मिळून सुमारे तीन लाख रुपयांचा ऐवज लंपास केला.



याबाबत सविस्तर बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास संजय माधव जाधव यांच्या निवासस्थानी चोरट्यांनी प्रथम घर कोणी केली त्यांच्या घरातील कपाटाची उसका पाचक करून देवतळे सोने व रोख रक्कम असे मिळून दोन लाखाचा ऐवज चोरून नेला नंतर या चोरट्यांनी संभाजी देवकर यांच्या वस्तीवर मोर्चा वळवला व त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून तोडताना आज प्रवेश करत आतील कपाटातील वस्तूंची उसका पाचक केली व कपाटाची तोडफोड करून उचकपाचक करीत एक लाख घरातील किमती वस्तूचे सुमारे एक लाखापर्यंत नुकसान केले. यानंतर चोरट्यांनी गोरख कापसे यांच्या घराकडे मोर्चा वळवला व तेथे चोरी करण्याचा प्रयत्न केला पण तो प्रयत्न असफल ठरला.

संभाजी देवकर हे नेहमीप्रमाणे सकाळी व्यायाम करण्यासाठी उठले असता त्यांच्या लक्षात ही बाब आली त्यांनी तातडीने लोणी पोलीस स्टेशनला फोन करून कळवले लोणी पोलीस स्टेशनचे एपीआय युवराज आठरे व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

## पारनेर तालुक्यातील तिघांवर हद्दपारीची कारवाई; दोन वर्षांसाठी जिल्ह्याबाहेर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी अहिल्यानगर ग्रामीण पोलिसांनी कठोर पावले उचलली असून, पारनेर तालुक्यातील तीन सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (१)(अ)(ब) अन्वये हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. आदिनाथ मच्छिंद्र पठारे, विजय बाळासाहेब रोहोकळे आणि किरण बबन कोळपे अशी त्यांची नावे आहेत. यापैकी पठारे व रोहोकळे यांना दोन वर्षांसाठी, तर कोळपे याला एक वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदिनाथ मच्छिंद्र पठारे (वय ३०, रा. पठारवाडी, ता. पारनेर) याच्याविरुद्ध पारनेर, घोडेगाव आणि शिरूर पोलीस ठाण्यांत एकूण सहा गुन्हे दाखल आहेत. विजय बाळासाहेब रोहोकळे (वय २५, रा. भाळवणी, ता. पारनेर) याच्याविरुद्ध सात गुन्ह्यांची नोंद आहे. तर किरण बबन कोळपे (रा. विळद, ता. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध एमआयडीसी, राहुरी, कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्यांत एकूण पाच गुन्हे दाखल आहेत.

संबंधित पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी या तिघांविरुद्ध हद्दपारीचे प्रस्ताव सादर केले होते. अहिल्यानगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी प्रस्तावांची चौकशी करून अहवाल संबंधित उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे सादर केला. या अहवालाच्या आधारे श्रीगोंदा-पारनेर आणि अहिल्यानगर येथील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी हद्दपारीचे आदेश पारित केले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पारनेर, सुपा, नगर तालुका आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी यापुढेही प्रतिबंधात्मक कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## शेतजमिनीच्या वादातून मारहाण; दहा जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शेतजमिनीची मशागत करण्यास विरोध करत ही जमीन आमच्या ताब्यात असल्याचे सांगून शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील आरडगाव येथे ११ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बापूसाहेब अशोक धसाळ (वय ४४, रा. आरडगाव) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. धसाळ व इंद्रभान यादव झुगे यांनी ८ ऑक्टोबर रोजी गाढवे कुटुंबीयांकडून शेजारील शेतजमीन खरेदी केली होती. या जमिनीलगत बाळासाहेब आटोळे यांची शेती आहे.

११ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास बापूसाहेब धसाळ, इंद्रभान झुगे, आदित्य झुगे व यश झुगे हे खरेदी केलेल्या जमिनीची मशागत करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपींनी संबंधित जमीन गाढवे यांच्याकडून वाट्याने करत असून ती आपल्या ताब्यात असल्याचे सांगत मशागत करण्यास विरोध केला. यावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत बांबू, लोखंडी पाइप, दगड तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

तसेच, आरोपी महिलांनी स्वतःचे कपडे फाडून महिलांविषयीच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या मारहाणीदरम्यान इंद्रभान झुगे यांच्या हातातील आठ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी पडून गहाळ झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी दीपक बाळासाहेब आटोळे, विजय संभाजी आटोळे, मोहन संभाजी आटोळे, किरण विजय आटोळे यांच्यासह अन्य सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
स्फूर्तीस्थान
लोकमाता अहिल्यादेवी होळकर ग्रा.बि. शेती सह. पतसंस्था मर्या; बेलापूर बु।।
ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर
ना.प्रा.राम शिंदे साहेब
सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य
श्री. अशोक विश्वनाथ राशिनकर
(संस्थापक, चेअरमन)
सर्व संचालक मंडळ, सभासद व ठेवीदार
• सांपत्तिक स्थिती •
• ५० कोटींकडे वाटचाल. • वसुल भागभांडवल रु. १ कोटी १२ लाख • राखीव निधी रु. ३५ लाख
• ठेवी ४१ कोटी. • कर्ज वाटप ३१ कोटी ५० लाख. • एकूण व्यवसाय ७२ कोटी ५० लाख
• सतत ऑडीट वर्ग 'अ' प्राप्त संस्था. • स्वमालकीची भव्य दिव्य इमारत • स्वभांडवली कर्जवाटप
• पूर्ण संगणीकृत संस्था. • RTGS/NEFT सुविधा • लॉकर सुविधा • विनम्र व तत्पर सेवा

श्री.नाना केटरर्स
श्रीरामपूर, शिर्डी
आमच्या सेवा
लग्नकार्य, वाढदिवस, साखरपुडा, पार्टी सर्व शुभकार्यासाठी उत्तम जेवणाची व्यवस्था
प्रो.प्रा.वैभव जैत पा.
मो.९५९५९५८१००, ९५९५९७५९२५
A.J फॅशन, किशोर टॉकीज कॉम्प्लेक्स, छ.शिवाजी महाराज रोड, श्रीरामपूर

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
श्री.सुधीर वेणुनाथ पा.नवले
सभापती - कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर

GRADUATE TEA | Deputy SAMOSA
एकदा खाल्ली की परत परत यावेशे वाटेल अशी... झणझणीत मिसळ !
स्पेशल मिसळ थाळी १००/- (२ पावसह)
श्रीरामपूरकरांनो,
आता मिसळ खायला नाशिक आणि पुण्याला जायची गरज नाही !
आता मिसळ मिळणार श्रीरामपूरमंध्ये !
मिसळसोबत Graduate Tea चा मस्त कप ! आनंद घ्या ! चला... आजच भेट घा आणि मिसळचा आनंद घ्या...
प्रो.प्रा.स्वप्नील लांडे पा.
प्रो.प्रा.राजेंद्र लांडे पा.
अमित प्लाझा, मेनरोड, भगतसिंग चौक, मुथूट फायनान्सच्या खाली, श्रीरामपूर.

पार्टनर बॅटरीज अँण्ड सोलर
यांच्या कडून राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
श्री.संजय टेकाळे ९८९०४५०३९२ | श्री.पार्थ टेकाळे ९६८९६५८००५ | श्री.हर्षल दांगट ९८६०९९७९३३

यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्या., जि. अ.नगर
यशवंत विश्वासाचे प्रतीक
मुख्य कार्यालय : स्टेट बँकेजवळ, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर फोन नं. (02422) 224934/35
शाखा : श्रीरामपूर, काष्टी, कोल्हार, नेवासा फाटा, राहाता, बेलापूर, संगमनेर
दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
वैशिष्ट्ये
आर.टी.जी.एस. सुविधा | मोबाईल एसएमएस सुविधा
स्वभांडवलावर कर्जवाटप | स्वमालकीची इमारत
खातेदारांसाठी डी.डी. सुविधा | लाईट बिल भरणा
सोनेतारण | वाहन तारण कर्ज
सोने खरेदी कर्ज सुविधा | एफ.डी.सी.सी. कर्ज सुविधा
कोअर बँकिंग सेवा
मा.श्री. मधुकरराव सातव (व्हा. चेअरमन) | मा.श्री. साहेबराव रक्टे (चेअरमन) | मा.श्री. एम.एस. निंबाळकर (जनरल मॅनेजर)
- संचालक मंडळ -
श्री. प्रकाशराव करडे, श्री. गुलाबराव पादीर, श्री. बाळासाहेब लांडे, श्री. वसंतराव बारगळ, श्री. एकनाथ खेडेकर
श्री. अंशुमन वाकचौरे, श्री. गजानन पुंड, श्री. रामदास वडितके, श्री.विकास फणसे, श्रीमती सुरेखाताई सातव
नि. संचालक - श्री. रावसाहेब करडे, श्री. दत्तात्रय गावडे, सौ. मनिषाताई गवळी

डॉ.नवले मणक्याचे हॉस्पिटल
छ.शिवाजी महाराज रोड, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर
फोन (०२४२२)२९७०२३, ९६६५२३९८५८

संपुर्ण परिवाराच्या वस्त्र खरेदीसाठी...
अरुण कतारे ९५११९३०९३०
nakShatra नक्षत्र कलेक्शन
फॅन्सी साड्या, शर्टींग, सुटींग, ड्रेस मटेरीयल, रेडीमेड, होजिअरी
गोंधवणी रोड समोर, एज्युकेशन शाळेसमोर, लक्ष्मीनारायण नगर, श्रीरामपूर

सुयोग मुद्रणालय
संदीप वसंतराव जौक ९०२८७२०३०४
लग्नपत्रिका, बीलबुके, पोस्टर्स, हॅण्डबील्स, अहवाल, बायंडींग, व्हीजीटींग कार्डस्, रबरी शिक्के, फ्लेक्स बोर्ड, कलर प्रिंटस्, आर्ट वर्क व सर्व प्रकारची छपाई
नेवासा रोड, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

।। ॐ जनार्धनाय नमः ।। ।। श्री शांतीगिरीय नमः ।।
किशोर कालंगडे ९८५०३९५७९०
श्री गुरुकृपा ट्रेडर्स
कांदा व्यापारी कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीरामपूर
दिनेश पवार ९४२३१६१६४६
सदगुरु ट्रेडर्स
कांद्याचे आडते व्यापारी
भाजीपाला, कांदा, बटाटा, मिरची, लसून, शेंगा, फळांचे व्यापारी व दलाल
मार्केट यार्ड, गाळा नं.१५, १६, नेवासा रोड, श्रीरामपूर, जि.अ.नगर(महाराष्ट्र)

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
श्री.चरणदादा त्रिभुवन
शिर्डी लोकसभा अध्यक्ष
रिपब्लिकन सेना

नोंदणी क्रमांक - ANR/SMR/RSR/636/1991 नोंदणी तारीख ३१/१/१९९१
अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर फोन.०२४२२-२२४५२५
संस्थेची वैशिष्ट्ये : १) श्रीरामपूर शहरात स्वमालकीची प्रशस्त इमारत २) संस्थेचे स्वमालकीच सभागृह व मंगलकार्यालय ३) संस्थेचे स्वमालकीचे दोन गोदाम ४) लॉकर्सची सुविधा उपलब्ध ५) कार्यालयीन कामकाज संपुर्णपणे ऑनलाईन ६) सोनेतारण कर्ज सुविधा ७) गोदामतारणपावती कर्ज योजना. ८) ठेवीवर लाभदायक व्याज (जेष्ठ नागरीक, विधवा, अपंग इ. साठी ठेवीवर अर्धा टक्का जादा व्याज) ९) दरवर्षी ७० गरीब विद्यार्थ्यास शालेय गणवेष वाटप १०) सभागृह (मंगलकार्यालय) योजना ११) NEFT/RTGS सुविधा व SMS सुविधा
श्रीमती सुनिता साहेबराव ढगे (व्हा. चेअरमन) | सौ. राधिका कृष्णा पवार (चेअरमन)
संचालिका
सौ. सुशिलाताई विठ्ठलराव नवले, सौ. के.डी. देशमुख, सौ. लताताई प्रकाशराव धनवटे
सौ. आशा सुहास बंगाळ, डॉ.सौ. वैशाली मयुर कापसे, सौ. मनिषा ज्ञानेश्वर ढोकचौळे
सौ. पुर्वा सुहास वखरे, सौ. संगिता सुरेश देवकर, सौ. वंदना सुरेश पवार
व्यवस्थापक : श्री आण्णासाहेब कचरु जाधव जनसंपर्क अधिकारी : श्री राजाराम निवृती काकडे
सर्व कर्मचारी वृंद व दैनिक ठेव प्रतिनिधी

मे. श्रीरामपूर गॅस कंपनी
जीहाँ!
HP GAS your friendly gas
दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
HP गॅसचे अधिकृत विकरक
सनासुदीच्या शुभमुहूर्तावर HPCL NAVYA चा शुभारंभ
हलके वजन - उचलणे सोपे
टिकाऊ डिझाईन - मजबूत, गंजरोधक कंपोझिट बॉडी
सुरक्षित आणि विश्वासाई - स्फोटरोधक तंत्रज्ञानाने बनवलेले
स्मार्ट तंत्रज्ञान - तुमच्या गॅसची पातळी लगेच पहा
गॅस सिलिंडर बुकिंगसाठी आता तुमचा आधार e-KYC करा आणि वितरण कोड नक्की मिळवा!
संपर्क : 0222 222829/226801 | पत्ता : बेलापूर रोड, श्रीरामपूर

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनानिमीत्त हार्दिक शुभेच्छा...
• गॅस बुकींग साठी ७७१०९ ५५५५५ या मिसकॉल करा किंवा ७७१५० १२३४५, ७७१८० १२३४५ ह्या नंबरवर कॉल करा.
• सर्वांना सिलेंडर घरपोहच मिळेल. कुणीही सिलेंडर ऑफीस /गोडाऊन वर आणू नयेत.
• प्रत्येक ५ वर्षातून एकदा आपल्या गॅस संचाची तपासणी करणे आवश्यक आहे.
• सुरक्षा नळी प्रत्येक पाच वर्षांनी बदलणे आवश्यक आहे.
• कृपया गॅस सिलेंडरची डिलिव्हरी घेताना, लिकेज, वजन, बिल इत्यादी बाबतची खात्री करून घ्यावी. तसेच भरलेले गॅस सिलेंडर मिळाल्याशिवाय डिलिव्हरी कोड (OTP), रिकामे सिलेंडर व पैसे देऊ नयेत.
EXCHANGE OFFER
कोणतीही जुनी शेगडी आणा व घेवून जा नवीन आकर्षक गॅस शेगडी वॉरंटी सह
नवीन गॅस कनेक्शन व दुसरे सिलेंडर त्वरीत उपलब्ध
भारतगॅस बनाइये खाना, परोसिये प्यार
भारत गॅस वितरक
मे. सुधीर गोविंद जोशी
नेवासा रोड, श्रीरामपूर, मोबा. ८८५५८१३४४३
फोन (०२४२२) २२२८१०, २२५२६७